रायगड, रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## वायनाडमध्ये प्रियांका गांधी विजयी

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांचा केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघात ४ लाख १० हजार मतांपेक्षा अधिक मतांनी विजय झाला. त्यानंतर त्यांनी वायनाडच्या जनतेचे आभार मानले आहेत. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, १३ नोव्हेंबरला झालेल्या वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीच्या मतदानात ६४.२४ टक्के मतदान झाले होते. २००९ च्या पहिल्या मतदानानंतर यंदा सर्वांत कमी मतदान या मतदारसंघात झाले आहे. प्रियांका गांधी यांच्याविरोधात लोकतांत्रिक मोर्चाचे उमेदवार सत्यन मोकेरी आणि नव्या हरिदास यांच्यासह १३ उमेदवार रिंगणात होते.

## सांगोल्यात फडकला लाल बावटा

### शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख विजयी

**■ शहाजी पाटील व दीपक साळुंखेंचा दारुण पराभव**

**। सांगोला । प्रतिनिधी ।**

सांगोला मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी 'काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेल, सगळं ओकेमध्ये आहे' या डायलॉगने प्रसिद्धी मिळविलेल्या विद्यमान आ. शहाजी बापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांचा २५ हजार ३८६ मतांनी दणदणीत पराभव केला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सांगोला मतदार संघ हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला राहिला आहे. मागील निवडणुकीत शेकापच्या उमेदवाराचा फक्त ७६८ मताने पराभव झाला होता. त्यामुळे शहाजी बापू पाटील यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. तर, गेली पाच वर्षे शहाजी बापू पाटील व दीपक साळुंखे हे विकासकामाच्या नावावर एकत्र येऊन आमची अभेद्य जोडी असल्याचे सांगत होते. मागील दीड महिन्यांपूर्वी दीपक आबा साळुंखे पाटील यांनी आपला निवडणूक लढविण्याचा मनसुबा जाहीर केल्याने त्यांनी मागचा पुढचा विचार न करता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला व उमेदवारीही मिळवली. त्यामुळे या मतदारसंघात शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख, आ. शहाजी बापू पाटील, दीपक साळुंखे पाटील व अन्य १३

•> पान २ वर



## विशेष संपादकीय

## हे नेमके काय झाले?

निवडणुकीत उतरलेले पक्ष, मतदार, पत्रकार यापैकी कोणाचाच विश्वास बसू नये अशी घटना महाराष्ट्रात घडली आहे. महायुतीला जवळपास तीन चतुर्थांश बहुमत मिळाले आहे. खुद्द महायुतीच्या नेत्यांनाही हे सर्व अनपेक्षित होते. त्यांनीही आपल्या पत्रकार परिषदेत ही आश्चर्याची भावना वारंवार व्यक्त केली आणि जनतेला साष्टांग दंडवत घातला. हे नेमके काय घडले आणि का घडले, याची चर्चा पुढील अनेक वर्षे होत राहील. मात्र, नव्या विधानसभेत कोण्या एका विरोधी पक्षाला २८८ च्या एकदशांश म्हणजे २८ जागाही मिळालेल्या नाहीत, हा अभूतपूर्व प्रकार आहे. विरोधी पक्षांची इतकी धूळधाण काँग्रेस ऐन भरात असतानाही कधी झाली नव्हती. जनतेने विरोधकांवर इतक्या त्वेषाने का वार केला, आणि का पराभूत केले, हे काहीसे अनाकलनीय आहे. काही नेत्यांनी या निकालाबाबत संशय व्यक्त केला आहे. प्रचाराच्या काळात जे वातावरण सर्वांनी पाहिले, ते पाहता विरोधकांबाबत असा राग कोठेही दिसला नव्हता. उलट, शरद पवार असोत की उद्धव ठाकरे वा राहुल गांधी यांच्या सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिसला होता. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी आलेला निकाल अनाकलनीय आहे. मात्र, तो नम्रपणे स्वीकारणे हेच आता योग्य ठरेल. या निकालाचे सविस्तर विश्लेषण आम्ही उद्या व नंतरही करीत राहूच. मात्र, ज्या पद्धतीचे राक्षसी बहुमत महायुतीला मिळाले आहे, ते पाहता यामागे विचारीपणा आहे असे वाटत नाही. उलट, मतदारांची ही अत्यंत बेभान कृती वाटते. भाजप नेत्यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' यासारख्या घोषणांनी जनतेत एक हिंदुत्ववादी उन्माद निर्माण झाला असावा, असे मानायला भरपूर जागा आहे. लोकसभा निवडणुकांनंतर इंडिया आघाडीने फेक नॅरेटिव्ह पसरवून मुस्लिम व दलितांची एक गठ्ठा मते आपल्याकडे वळवली, असे तुणतुणे महायुतीने सतत वाजवले. त्याचा परिणाम म्हणून बहुधा हिंदुंमध्ये एक होण्याची एक लाटच उसळलेली दिसते. मराठा आरक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी व इतर सर्व प्रश्न किरकोळ ठरले आणि त्यावर ही लाट भारी ठरली. भाजपने ज्या रीतीने आपले वर्चस्व निर्माण केले आहे, ते पाहता महाराष्ट्र, गुजरात व उत्तर प्रदेश यांच्या मार्गाने चालला आहे काय, असाही प्रश्न निर्माण होतो. जे यश नरेंद्र मोदींना लोकसभेत मिळवायचे होते, ते देवेंद्र व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्रात मिळवून दाखवले आहे. मात्र, तरीही हा निकाल अविश्वसनीयच राहील. ●●

# ईव्हीएमचा विजय...



**अविश्वसनीय निकालाने जनता बुचकळ्यात**

**। मुंबई । विशेष प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत खुद्द भाजपलाही लाजवेल अशा मिळालेल्या यशानंतर पुन्हा एकदा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम)चा मुद्दा चर्चेला आला आहे. महाविकास आघाडीची लाट असताना, तसेच लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने आघाडी घेऊनही विधानसभेत महाविकास आघाडीला जेमतेम पन्नाशी गाठता येणं, हा अविश्वसनीय निकाल असल्याचं संपूर्ण महाराष्ट्र बोलत आहे. याबाबत अनेक दिग्गज, ज्येष्ठ नेत्यांची प्रश्न उपस्थित केल्याने कार्यकर्त्यांनी ईव्हीएमचा विजय असो... अशी घोषणाबाजी केल्याचे पहावसाय मिळाले.

अनेक ठिकाणी सत्ताधारी आणि महाविकास आघाडीमध्ये कांटे की टक्कर होईल, असे चित्र होते. मात्र, चित्र बदलत गेले आणि काही वेळातच भाजपा स्वबळावर सरकार स्थापन करेल असे चित्र निर्माण झाले. त्यानंतर ईव्हीएममधील गडबडीची चर्चा मतमोजणी केंद्रात सुरू असल्याचे पहायला मिळाले.

लोकसभा निवडणुकीसारखेच विधानसभेतही राज्यात महाविकास आघाडीच्या बाजूने वातावरण असताना आजचा लागलेला निकाल अनपेक्षित म्हणावा लागेल. राज्यातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने, असाही संशय महाविकास आघाडीच्या नेत्यांककडून व्यक्त केला जात आहे. कारण, मतदानाच्या दिवशी सायंकाळी पाच वाजेपर्यंत झालेले मतदान आणि त्यानंतर मतदानाचा झालेला वर्षाव हाही चिंतनाचा विषय आहे. तसेच, लोकसभेच्या मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यात निवडणूक आयोगाने दाखविलेलीतत्परता विधानसभेवेळी दिसून आलेली नाही. मतदानाच्या दुसऱ्या दिवसापर्यंत प्रशासन आकडेवारी जाहीर करीत होते. त्यामुळे ईव्हीएममधील चलाखीचा संशय विरोधकांकडून व्यक्त होतोय. दरम्यान, आजच्या निकालानुसार राज्यात पुढील पाच वर्षे महायुतीचे सरकार राहणार असून, महाविकास आघाडीला विरोधक म्हणून जोरदार कामगिरी करावी लागेल.

भाजपच्या नेतृत्वातील महायुतीने विधानसभा निवडणुकीत यश मिळवलं आहे. भाजपला १३३ जागा मिळाल्या आहेत, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेला ५७ जागांवर यश मिळालं आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीचेही ४२ आमदार निवडून आले आहेत. तर महाविकास आघाडीला ४८ जागा मिळाल्या असून, त्यामध्ये शिवसेना ठाकरे गट २०, काँग्रेस १५, शरद पवार गट ९ जागांचा समावेश आहे.

दरम्यान, निकालाबाबत उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, आम्ही ज्या प्रचारसभा घेतल्या, हा निकाल म्हणजे अनाकलनीय आहे. लोकांनी महायुतीला मते का दिली? सोयाबीनला भाव मिळत नाही म्हणून, महाराष्ट्रातील उद्योग राज्याबाहेर जात आहेत म्हणून, महिलांना सुरक्षितता नाहीय म्हणून दिली की, नेमकी कोणत्या रागापोटी ही लाट उसळली आहे हे कळत नाहीय. हा निकाल अनाकलनीय आहे, यामागंच गुपित शोधावं लागेल. आपण निराश होऊ नका. खचून जाऊ नका.

•> पान २ वर

> **"मतदारसंघातील जनतेने दिलेले भरभरुन मतदानरुपी प्रेम आणि कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत यामुळे आज ही लढाई आपण लढलो. हार-जीत होत असते. त्यामुळे कोणीही कार्यकर्त्यांनी खचून न जाता, संयम बाळगावा. हा लढा पुढे असाच चालू राहील."**
> **– प्रीतम म्हात्रे, उमेदवार, उरण**

## निवडणुकीत धनशक्तीचा विजय

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीच्या निकालाचे चित्र शनिवारी दुपारपर्यंत स्पष्ट झाले. महाविकास आघाडी विरुध्द महायुतीमध्ये झालेल्या या लढतीमध्ये आश्वासनांचा पाऊस पाडणारे उमेदवार निवडून आले. मतदारांना आमिष दाखवून, अनेक आश्वासनं देत तर काही ठिकाणी दबावतंत्र वापरुन सत्ताधाऱ्यांनी राजकारण केल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला. धनशक्तीपुढे जनशक्ती हारली, असे मतही अनेकांनी व्यक्त केले.

जिल्ह्यामध्ये २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले. अलिबाग, पेण, कर्जत, महाड, श्रीवर्धन, उरण, पनवेल या विधानसभा मतदार संघातील २४ लाख ८८ हजार ७८८ पैकी १७ लाख २१ हजार ३८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये आठ लाख ३८ हजार ४५९ महिला व पुरुष आठ लाख ८२ हजार ५५५ आणि इतर २४ मतदारांनी मतदान केले. मतदानानंतर अनेक राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे मतमोजणीकडे लक्ष लागून राहिले होते. अखेर शनिवारी सकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीला टपाली मतांची मोजणी करण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतांची मोजणी फेरीनुसार करण्यात आली. जिल्ह्यातील श्रीवर्धन, पनवेल, अलिबाग, कर्जत, उरण, पेण व महाडमध्ये महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला.






# भातझोडणीला आधुनिकतेची जोड

## जिल्ह्यातील ५० हून अधिक शेतकऱ्यांची यंत्राला पसंती

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

रायगड जिल्ह्यात पारंपरिक पद्धतीने होणारी भातझोडणी आता आधुनिकतेकडे वळू लागली असल्याचे चित्र गावागावात दिसून येत आहे. यंत्राच्या मदतीने जिल्ह्यात भातझोडणीला अधिक पसंती दिली जात आहे. जिल्ह्यातील ५० हून अधिक शेतकऱ्यांनी भातझोडणी यंत्र घेऊन आधुनिकेतची जोड दिल्याचे दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्याची पूर्वी भाताचे कोठार म्हणून ओळख होती. परंतु, वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरणामुळे भाताचे क्षेत्र हळूहळू कमी होऊ लागले. खर्च अधिक व उत्पन्न कमी यामुळे अनेक शेतकऱ्यांनी शेती करण्यास पाठ फिरवली. त्यामुळे जिल्ह्यातील भातपिकाचे क्षेत्र घटू लागले. भातपिकाबरोबरच फळ पीक, भाजीपाला लागवडीवर भर देण्यासाठी कृषी विभागाने जनजागृती सुरू केली. फळ व भाजीपाला लागवडीसाठी गावागावात बैठका घेऊन शेतकऱ्यांना शेतीकडे वळण्यास प्रोत्साहित केले. भातपिकाबरोबरच फळ व भाजीपाला पीक लागवड करण्याकडे शेतकरी वळू लागला. त्यामध्ये तरुणवर्गाचादेखील प्रतिसाद वाढला.



### यंत्रामुळे भाताचा पेंढा गायब

**पारंपरिक पद्धतीने भातपिकाच्या झोडणीसाठी मजूरकर घेतले जातात. झोडणीतून उपलब्ध झालेला पेंढा गोठ्यामध्ये साठवून ठेवला जातो. तो पेंढा पावसाळ्यात व उन्हाळ्यात गाय, म्हैस, बैल अशा पाळीव जनावरांसाठी खाद्य म्हणून उपयोगी ठरतो. परंतु, आधुनिक पद्धतीने भात झोडणीमुळे भाताच्या पेंढ्याचे रुपांतर भुश्यामध्ये रुपांतर होते. त्यामुळे यंत्रामुळे भाताचा पेंढा गायब होण्याची भीती व्यक्त केली जात असताना, गुरांना अन्यवेळी पेंढा मिळणे कठीण होण्याची चिंता अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.**

कमी मनुष्यबळात शेतीची कामे करण्यासाठी आधुनिक यंत्र सवलतीच्या दरात देण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून आधुनिक पद्धतीने शेती करू लागला आहे. चारसूत्री पद्धतीने भातलागवड करण्यापासून रोपे लागवड, भातझोडणीची कामे आधुनिक पद्धतीने करण्यात आली. जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून भातकापणी सुरु झाली आहे. ९५ टक्क्यांहून अधिक भातकापणीची कामे पूर्ण झाली आहेत. काही ठिकाणी भाताची रोपे बांधून उडवी रचण्याचे काम केले जात आहे. काही ठिकाणी कापणी केल्यानंतर पाच दिवसांनंतर झोडणी केली जात आहे. परंतु, झोडणीसाठी मजूर मिळत नसल्याने झोडणीची कामे लांबणीवर जाण्याची चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने झोडणीला महत्त्व देण्यास सुरुवात केली आहे. यंत्राद्वारे झोडणीची कामे जिल्ह्यातील अनेक भागात केली जात आहे. पारंपरिक पद्धतीने होणारी झोडणीची कामे यंत्रामुळे अवघ्या दोन ते चार तासांत पूर्ण होत आहेत. कमी मनुष्यबळाच्या मदतीने ही कामे होत असल्याने शेतकऱ्यांच्या वेळ व पैशाचीदेखील बचत होत असल्याचे बोलले जात आहे.

# एनएमएमटीत सुट्या पैशांअभावी वादावादी

**वाहक वैतागले; परिवहन विभागाने तोडगा काढण्याची मागणी**

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रमातील बसमध्ये सध्या सरसकट महिलांसाठी तिकिटाची रक्कम अर्धी करण्यात आली आहे. यामुळे महिलांचा परिवहन उपक्रमाच्या बसला चांगला प्रतिसाद मिळत आहे, परंतु तिकीट घेताना जास्त मूल्यांच्या नोटा महिलावर्ग काढत असल्याने सुट्या पैशांचा तुटवडा जाणवत आहे. यामुळे काही महिला ग्राहक व वाहकांमध्ये वारंवार खटके उडू लागले आहेत. यामुळे परिवहन विभागाने यावर तोडगा काढावा, असे महिला प्रवाशांकडून सांगण्यात येत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील परिवहन विभागातील बसमध्ये महिलांना अर्धे तिकीट केले आहे. त्यानंतर नवी मुंबई परिवहन उपक्रमातील बसमध्येदेखील महिलांसाठी अर्धे तिकीट लागू करण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर महिला अर्धे तिकीट काढून प्रवास करत आहे. यामुळे परिवहन सेवेलादेखील चांगला प्रतिसाद मिळत असून, उत्पन्नात चांगली वाढ होत आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून बसमध्ये सुट्या पैशांअभावी महिलावर्ग व वाहकांमध्ये खटके उडू लागले आहेत. एनएमएमटीमधून प्रवास करणाऱ्या बहुतांशी महिला या नियमित कामानिमित्त प्रवास करत असतात, मात्र शंभर-पन्नासची नोट काढल्यावर सुट्या पैशांअभावी वाहकांबरोबर त्यांचे खटके उडू लागले आहेत. सर्व प्रवाशांना सुटे पैसे देणे शक्य होत नसल्याचे वाहकांकडून सांगण्यात येत आहे. यामुळे महिला प्रवाशांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### महिला काढताहेत शे-दोनशेची नोट

**सध्या एनएमएमटीच्या पहिल्या टप्प्याचे तिकीट दर हे सात रुपये आहे, तर वातानुकूलित बसच्या पहिल्या टप्प्याचे तिकीट दर १० रुपये आहे. महिलांसाठी या तिकीट दरामध्ये पन्नास टक्के सवलत दिली आहे. त्यामुळे महिलांना साधारणतः चार रुपये व वातानुकूलित बससाठी पाच रुपये आकारले जाते, परंतु या प्रवासातदेखील काही महिला शंभर किंवा दोनशेच्या नोटा काढत आहेत. यामुळे वाहक सुटे पैसे द्यायचे कुठून या विवंचनेत अडकले आहेत.**



# अनधिकृत बॅनर्स हटविण्याची विशेष मोहीम

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बॅनर्स, तसेच होर्डिंग हटविण्याची विशेष मोहीम २५ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. ही मोहीम सर्वच आठही विभागांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार असून यामध्ये परवानगी न घेतलेले, तसेच परवानगी संपुष्टात आलेले अनधिकृत बॅनर्स, होर्डिंग हटविण्यात येणार आहेत.

उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकांच्या आदेशान्वये ही मोहीम राबवण्यात येणार असून, या मोहिमेंतर्गत महापालिका क्षेत्रातील परवानगी न घेतलेले, तसेच परवानगी संपुष्टात आलेले अनधिकृत बॅनर्स, होर्डिंग हटविण्यात येणार असून यासाठी आलेला खर्च दंडात्मक रकमेतून संबंधितांकडून वसूल करण्यात येणार आहे. होर्डिंग, बॅनर्स, पोस्टर हे शहर सौंदर्यीकरणाला बाधा पोहोचविणारे असून, या मोहिमेनंतरच्या कालावधीत विनापरवानगी होर्डिंग, बॅनर लावण्यात येऊ नयेत, असे पालिकेकडून सूचित करण्यात येत आहे. अन्यथा संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

### तक्रार करण्यासाठी सूचना

**नवी मुंबई शहरात लावण्यात येणारे अनधिकृत बॅनर्स, होर्डिंगसंबंधी संबंधित विभाग कार्यालयात, महापालिकेच्या वेबसाइटवरील ग्रिव्हेन्स रिड्रेसल पोर्टलवर अथवा नवी मुंबई महापालिकेच्या ८४२२९५५९१२ या व्हॉट्सॲप क्रमांकावर नागरिकांनी तक्रार करावी.**



नवी मुंबईकर नागरिकांनी आपल्या शहराचा स्वच्छ व सुंदर शहर हा नावलौकिक टिकविण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी तसेच, शहर विद्रूपीकरणाला प्रतिबंध घालण्यासाठी सहकार्य करावे.-
- डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, महापालिका.

## संजीवनी नर्सिंगमध्ये जागतिक मधुमेह दिन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संजीवनी प्रशिक्षण संस्था संचलित संजीवनी डीएमएलटी नर्सिंग कॉलेजमध्ये नुकताच जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. वृषाली बापट उपस्थित होत्या.

नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना डॉ. वृषाली बापट यांनी मधुमेह आजाराविषयी मार्गदर्शन केले. मधुमेहाची लक्षणे म्हणजे सतत थकवा येणे, घाम येणे, हात थरथरणे, तहान लागणे, सारखे युरिनला होणे, जास्त भूक लागणे, वजन कमी होणे चक्कर, जखम लवकर न भरणे, ही मधुमेहाची लक्षणे आहेत.

रक्तामध्ये साखर साठवून राहते तिथे उर्जेमध्ये रुपांतर होत नाही. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते. या वाढलेल्या साखरेचा परिणाम शरीरावर होतो. मेंदूच्या पेशीवर तसेच डोळ्यांवर म्हणजे प्रतिमा व्यवस्थित दिसत नाही. पचनावर परिणाम, हाड ठिसूळ होणे, पॅनक्रियामध्ये साखर साठवून राहते. त्याचा परिणाम हृदयावर, किडनीवर होतो, असे त्यांनी सांगितले.

# रेल्वे पुलाजवळ कचऱ्याचा ढीग

## ग्रामपंचायतीसह एमआयडीसीचे दुर्लक्ष; मोकाट जनावरांचा ठिय्या

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी शहराजवळील औद्योगिक वसाहतीमध्ये कोकण रेल्वे पुलाजवळ रस्त्याशेजारी मोठ्याप्रमाणात कचरा साचलेला आहे. याबाबत ग्रामपंचायतीसह एमआयडीसी विभागाचे दुर्लक्ष होत आहे. या परिसरातील टपरीवाले, छोटे-मोठे हॉटेल व्यावसायिक यांच्यासह काही नागरिक कचरा आणून टाकतात. ती जागा स्वच्छ करण्यासाठी यंत्रणाच नसल्यामुळे दुर्गंधीही पसरली आहे.

याठिकाणी बुधवारी (ता. २०) आयर्वेदिक औषधांच्या भरलेल्या बाटल्याही टाकून ठेवलेल्या होत्या. खाण्याच्या उद्देशाने तिथे गायी-गुरांसह मोकाट कुत्रे ठिय्या मांडून असतात. मिरजोळे एमआयडीसीमधून मिरजोळेकडे जाण्याच्या मार्गावर कोकण रेल्वेचा पूल ओलांडून जावे लागते. त्या पुलाशेजारील परिसरात गेले अनेक दिवस कचऱ्याचा ढीग साचलेला पाहायला मिळत आहे. हा कचरा वेळेत उचलला जात नाही. एमआयाडीसी परिसर असल्यामुळे कचरा उचलण्याची जबाबदारी कुणाची हा प्रश्न आहे. काही महिन्यांपूर्वी या ठिकाणी कोंबड्यांची पिसं आणि अन्य मांस आणून टाकले जात होते.

वारंवार होत असलेल्या तक्रारीनंतर यंत्रणेने तिथे साफसफाई करुन रेलींग बसविले होते. परंतू कालांतराने पूर्वी टाकण्यात येत असलेल्या जागेच्या विरुद्ध बाजूला कचरा टाकला जात आहे. प्लास्टिक पिशव्यांसह खाद्यपदार्थही टाकण्यात येत आहेत. ते कुजून गेल्यामुळे दुर्गंधीही पसरली आहे. वाऱ्याबरोबर प्लॅस्टिक पिशव्या उडून अस्ताव्यस्त पसरल्या आहेत. खाद्यासाठी मोकाट कुत्रे, जनावरे त्याठिकाणी डेरा टाकून बसतात. सायंकाळच्या वेळी त्या रस्त्यावरुन जाण्यास अनेकवेळा वाहनचालकही घाबरतात. मोकाट कुत्रे दुचाकी चालकांच्या मागे लागण्याचे प्रकार तिथे अनेकवेळा घडले आहेत.

**आदेशांचे पालन नाहीच**
**विधानसभा निवडणुकीपूर्वी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार यांनी शहराजवळील ग्रामपंचायतीचा परिसर स्वच्छ व सुंदर कसा राहील यासाठी सरपंच आणि ग्राम अधिकारी यांची संयुक्त बैठक घेतली होती. त्यांना कचऱ्याचे व्यवस्थापन करा अशा सूचना दिल्या होत्या. मात्र त्याचे पालन योग्य पद्धतीने केले जात नसल्याचे दिसत आहे.**



# मत्स्यसंपदा योजनेत चार प्रस्ताव मंजूर

## ■ नौका बांधणीला सुरुवात; खोल समुद्रात करता येईल मासेमारी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या अंतर्गत खोल समुद्रात मासेमारीसाठी ४ नौका मालकांचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. जिल्ह्यातील ४ कोटी ८० लाख रुपयांचे प्रस्ताव मार्गी लागल्याची माहिती मत्स्य व्यवसाय विभागाचे प्रभारी सहायक आयुक्त आनंद पालव यांनी दिली.यांत्रिक नौकेद्वारे मच्छिमारी करण्यासमोर अनेक आव्हाने उभी आहेत.

मच्छीमारांनी धाडस दाखवून खोल समुद्रातील मच्छिमारीसाठी प्रस्ताव करावेत, असे आवाहन केंद्र सरकारने केले आहेत. त्यासाठी प्रत्येक प्रस्तावाकरिता १ कोटी २० लाखांची योजना आहे. यापैकी ७२ लाख रुपये अनुदान, तर बाकी लाभार्थी गटाने गुंतवणूक करावी, अशी अपेक्षा आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात चार नौकांचे खोल समुद्रातील मच्छिमारीचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. रत्नागिरी तालुक्यातील ३ आणि राजापूर तालुक्यातील १ असे चार प्रस्ताव आहेत. या नौकांची बांधणी सुरू झाली आहे. चालू हंगामात २ ते ३ नौका खोल समुद्रात प्रत्यक्ष मासेमारी करू शकतील, असा अंदाज आहे. अधिकाधिक मच्छीमारांनी या योजनेसाठी पुढे यावे, असे सरकारचे धोरण आहे.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा एक भाग म्हणून पारंपरिक मच्छिमारांसाठी खोल समुद्रातील मासेमारी जहाजे संपादन करण्यासाठी समर्थन, निर्यात क्षमतेसाठी विद्यमान मासेमारी जहाजांचे अपग्रेडेशन आणि यांत्रिकी मासेमारी जहाजांमध्ये विशेष यंत्रणांची स्थापना करण्यास प्रस्तावित केले आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी पारंपरिक किंवा कारागीर मच्छिमार आणि त्यांच्या सोसायट्या, संघटना पात्र ठरू शकतात. लाभार्थ्यांकडे वैध मालकी प्रमाणपत्र, अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र, मासेमारीचा परवाना आणि बायोमेट्रिक ओळखपत्र असणे आवश्यक आहे, तरच संबंधित लाभार्थ्याचा प्रस्ताव मंजूर होऊ शकतो, असे पालव यांनी सांगितले.

**ट्यूना मासे पकडण्यास उपयुक्त खोल समुद्रातील मच्छिमारीसाठी या क्षेत्रातील संशोधकांनी अनेक शिफारशी केल्या आहेत. अलीकडच्या वर्षांत ट्यूना जातीच्या मत्स्य प्रजाती प्रामुख्याने अल्बाकोर, बिगये, ब्लूफिन, स्किपजॅक आणि यलोफिन अशा आढळून आल्या आहेत. या प्रजातींच्या एकूण जागतिक पकडीत जवळपास अनेक पटींनी वाढ झाली आहे. ट्यूना प्रजाती अनेक देशांमध्ये अन्नाचा एक महत्त्वपूर्ण स्रोत आहे. नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्डद्वारे मत्स्योत्पादनात वाढ करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या अनेक क्षेत्रांपैकी ट्यूना व तत्सम प्रजातीचे मासे पकडण्यास उपयुक्त आहेत, असे मत्स्य व्यवसाय विकास मंडळाने म्हटले आहे.**

## आशिष सावंत यांना मातृशोक

**पाली/गोमाशी :** सुधागड तालुक्यातील नांदगावचे सरपंच आशिष सावंत यांच्या मातोश्री अलका बाळाजी सावंत यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (दि. २१) नांदगाव येथे आपल्या राहत्या घरी झाले. त्यांच्या पश्चात पती बाळाजी सावंत, मुलगा आशिष, सुधीर तर मुलगी अश्विनी आणि नातवंडे असा परिवार आहे. अलका सावंत यांचा दशक्रिया विधी शनिवार ३० नोव्हेंबर रोजी नांदगाव येथे, तर उत्तरकार्य मंगळवार ३ डिसेंबर रोजी नांदगाव येथे होणार आहेत.



# हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेची तिसरी घंटा घुमणार

**। रत्नागिरी । वार्ताहर ।**

महाराष्ट्र सांस्कृतिक संचालनालयातर्फे हौशी मराठी राज्य नाट्यस्पर्धेचे उद्‌घाटन मंगळवारी (दि. २६) सायंकाळी सात वाजता येथील स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर नाट्यगृह येथे होणार आहे. यावर्षी या स्पर्धेत आठ नाटकांचा समावेश आहे. नाट्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य, सहसंचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत ६३व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेची प्राथमिक फेरी २४ नोव्हेंबरपासून राज्यातील विविध २४ जिल्हास्तरावरील केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत मराठी रंगभूमी समृद्ध करण्याकरिता विविध उपक्रम राबवत आहे. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेची गौरवसंपन्न ६२ वर्षे अविरत वाटचाल चालू आहे. ज्या द्वारे अनेक नाटककार, अभिनेते, तंत्रज्ञ व दिग्दर्शक निर्माण झाले आहेत त्यांनी नवनवीन प्रयोग करून या उपक्रमास व मराठी रंगभूमीस समृद्ध करून वैश्विक स्तर प्राप्त करून दिला आहे.

येथील सावरकर नाट्यगृहात स्पर्धेत होणारी नाटक अशी : मंगळवारी (ता. २६) ायंकाळी सात वाजता आजीचा बॉयफ्रेंड, २७ ला मॉर्फोसिस, २८ ला अखेरचा सवाल, २९ ला रूक्ष, १ डिसेंबरला महानायक, २ डिसेंबरला चांदणी, ३ ला कडीपत्ता, ४ ला स्वप्नपक्षी. नाट्यस्पर्धेतील नाटकांचा आस्वाद रत्नागिरीकर रंगकर्मींनी घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनायाचे संचालक विभिषण चावरे व अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले आहे.

- **जिल्ह्यातील आठ नाटकांचा समावेश**
- **सांस्कृतिक संचालनालयातर्फे आवाहन**

पान १ वरून

## ईव्हीएमचा विजय

हा ईव्हीएमचा विजय असू शकतो. महाराष्ट्राच्या जनतेला निकाल मान्य नसेल तर आम्ही प्राणपणाने लढत राहू. महाराष्ट्रातील जनतेला आम्ही वचन देतो की, आम्ही लढत राहू.

दरम्यान, माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, हे मतदान महाराष्ट्राने केले आहे की ईव्हीएमने केले आहे हा प्रश्नच आहे. यावर आम्ही चर्चा करूच. लोकसभेत महाराष्ट्राने आम्हाला आशीर्वाद दिला होता. पण विधानसभेत तो आम्हाला मिळाला नाही याचा आम्ही जरूर विचार करू. असे असले तरी यात ईव्हीएम किती प्रचार केला याचाही विचार करू. लागलेला निकाल आजच्यासारखा अपेक्षित नव्हता. यातील तांत्रिक गोष्टींवर आम्ही चर्चा करू, असेही आदित्य ठाकरे म्हणाले. तसेच पुन्हा जिंकू, असेही असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

## सांगोल्यात फडकला लाल बावटा

उमेदवार अशी लढत होती. दीपक साळुंखे पाटील हे प्रथमच निवडणूक लढवीत असल्याने ही निवडणूक प्रस्थापित तीन उमेदवारांच्या प्रतिष्ठेची होती. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी या निवडणुकीत घवघवीत यश मिळवले असून, विद्यमान आमदार शहाजी पाटील हे पिछाडीवर पडले. तर, त्यांचे एकेकाळचे सहकारी दीपक आबा साळुंखे पाटील हे तीन नंबरवर गेल्याने त्यांच्या राजकीय भवितव्याबद्दल उलटसुलट चर्चा सुरू आहे. डॉ. बाबासाहेब देशमुख यांना १ लाख १६ हजार २५६, शहाजीबापू पाटील यांना ९० हजार ८७० तर दिपकआबा साळुंखे पाटील यांना ५० हजार ९६२ एवढी मते पडली. तर, पोस्टल मतदानामध्ये डॉ. बाबासाहेब देशमुख १३४२, शहाजी पाटील ५४५, दिपक साळुंखे ७३८ मते मिळाली आहेत.

सुरुवातीला पहिल्या फेरीला शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांना केवळ १३८ मतांचे लीड मिळाल्याने काहीशा संभ्रमात असणाऱ्या शेकाप कार्यकर्त्यांमध्ये निरुत्साह दिसून आला. तर ही निवडणूक बापू व डॉ. बाबासाहेब यांच्यात चार-पाच हजारांच्या फरकाने होईल, असे वाटत होते. परंतु, २३ पैकी तीन फेऱ्यांमध्ये शहाजीबापूंना लीड सोडता प्रत्येक फेरीत डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे लीड कमी-जास्त प्रमाणात वाढतच गेले. प्रत्येक फेरीनंतर बाहेर शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष सुरू होता.२३ व्या फेरीची मतमोजणी संपल्यावर डॉ. बाबसाहेब देशमुख यांना २५ हजारांपेक्षा जास्त लीड मिळत असून, त्यांचा विजय दृष्टिक्षेपात येताच मतमोजणी कक्षातून डॉ. अनिकेत देशमुख बाहेर पडले. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठी घोषणाबाजी करीत त्यांना खांद्यावर घेऊन एकच जल्लोष केला.

डॉ. बाबासाहेब देशमुख हे संपूर्ण मतमोजणी झाल्यानंतर प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी मोजक्या कार्यकर्त्यांसह निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पोहोचले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी माळी यांनी त्यांना विजयाचे प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले.

शशिकांत गडहीरे बसप ८४८, राघू घुटुकडे ९७२, एकनाथ शेंबडे १६४, बाबासाहेब देशमुख ४६०, परमेश्वर गेजगे २६५, बाळासाहेब इंगवले १४२, मोहन राऊत ३२३, रणसिंह देशमुख ५०३, राजाराम काळेबाग ५२०, ज्ञानेश्वर उबाळे २७९, यापैकी कोणीही नाही (नोटा) ११०६ अशी अन्य उमेदवारांना मिळालेली मते आहेत.

## झाडाझुडपांमध्ये हरवला देवघर रस्ता

**चौल :** अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथून जाणारा देवघर-वरंडे रस्ता झाडाझुडपांनी व्यापला आहे. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दिवसभर या रस्त्यावरुन वाहनांची वर्दळ सुरू असते. या रस्त्यवरुन शाळकरी मुले ये-जा करतात. त्यामुळे अनेकदा समोरुन येणारे वाहन दिसून येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूची झाडे वाढल्याने रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे समोरासमोर दोन वाहने आली तर वाहने पुढे जाणे अवघड होत आहे. अनेकदा वाहनचालकांमध्ये वादाचे प्रसंगही उद्‌भवत आहेत. तरी, संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष देऊन कार्यवाही करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# आस्था थिटे, दिशा हळदे यांचे यश

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथील दिशा हळदे व आस्था थिटे यांनी वक्तृत्व स्पर्धेत यश संपादित केले आहे.

रोहा शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने दिवाळी सणाचे औचित्य साधून विविध प्रकारच्या ऑनलाईन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत श्रमिक विद्यालय चिल्हे येथील इ.७ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या दिशा दत्तात्रेय हळदे व आस्था विनोद थिटे यांनी वत्कृत्व स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व तृतीय क्र.पटकावला आहे.छत्रपती शिवराय यांचे विचार काळाची गरज या विषयावर दिशा आणि आस्था यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून या स्पर्धेत सुयश संपादित केले आहे.त्यांच्या यशाबद्दल समाजातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.



## थंडीच्या चाहुलीने बागायतदारांची लगबग

**रत्नागिरी :** कोकणातील पावसाळा ओसरताच गारठा वाढू लागला आहे. थंडीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या दोन दिवसांपासून पहाटेच्या थंडीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे येथील आंबा व काजू बागायतदाराच्या हालचालींना वेग आला आहे. थंडीची चाहूल लागताच बागायतादारांनी झाडांवर फवारणीसाठी तयारी सुरू केली आहे. बागायती पिंकावर येणाऱ्या संभाव्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य वेळी फवारणी करणे आवश्यक आहे. थंडीमुळे कीड आणि रोग नियंत्रणासाठी लागणाऱ्या रसायनांची जुळवाजुळव सुरु झाली आहे. सध्या जिल्ह्यातील वातावरण बदलत असल्याने बागायतदारांसाठी हा काळ अतिशय महत्वाचा ठरणार आहे. योग्य काळजी घेतल्यास आगामी हंगामासाठी काजू आणि आंबा बागा चांगली फळधारणा करतील असा विश्वास बागायतदारांकडून करण्यात येत आहे.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


**निवडक**

## पनवेल येथून तरूण बेपत्ता

**पनवेल :** ॲग्रीकल्चर धंद्यामध्ये ३० ते ४० लाख रुपयाचा तोटा झाल्याने तरुण कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. साजन कराळे असे या व्यक्तीचे नाव असून उंची ५ फुट ५ इंच, रंग सावळा त्याला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला ाहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा.

## वृद्ध महिला बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून पहाटेच्या सुमारास एक ६२ वर्षीय वृद्ध महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अनुसया शिर्के असे या म हिलेचे नाव असून, बांधा सडपातळ, रंग गोरा, डोक्याचे केस काळे पांढरे, पायात काळ्या रंगाची चप्पल घातलेली आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा.

## ५५ मोबाईलची चोरी

**नवीन पनवेल :** पनवेल शहरातील मोबाईलचे दुकान फोडून चोरट्याने ५४ नवीन मोबाईल आणि एक जुना मोबाईल असे २३ लाख ९५ हजार रुपये किमतीचे ५५ मोबाईल चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. शंकर हजारे यांचा मोबाईल विक्रीचा व्यवसाय आहे. कुणीतरी दुकानाचे शटर तोडले असल्याचे त्यांना वॉचमनने सांगितले. त्यांनी दुकानात पाहिले असता ५४ नवीन मोबाईल आणि एक जुना मोबाईल असे २३ लाख ९५ हजार १६३ रुपयांचे ५५ मोबाईल चोरीला गेले.

## चार मोबाईल चोरले

**नवीन पनवेल :** घराच्या गॅलरीचे खिडकीतून प्रवेश करून चार मोबाईल आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. अफफान बुबेरे यांना पहाटेच्या सुमारास जाग आली असता त्यांना एक मुलगा बाहेर जाताना दिसला. त्यांनी पाठलाग केला. यावेळी त्याने घराच्या गॅलरीतून खाली उडी मारली. त्या अनोळखी मुलाबरोबर इतर तीन इसम पळताना दिसले. त्यांच्या आणि काकांच्या घरातून चार मोबाईल, पंचवीस हजार रुपये चोरीला गेले.

## चेन केली जमा

**पनवेल :** रस्त्यामध्ये चालताना मिळालेली जवळपास ७ ग्रॅम वजनाची चेन प्रामाणिकपणे दोन इसमांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात येवून जमा केल्याने या दोघांचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने कौतुक करण्यात आले. अंकुश इंगळे व संतोष कोळेकर हे दोघे करंजाडे परिसरातून पायी जात असताना त्यांना रस्त्यात ७ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन पडलेली दिसली. त्यांनी ती ताब्यात घेवून चौकशी केली असता चेनचा कोणीही मालक मिळून न आल्याने त्यांनी त्वरित पोलीस ठाण्यात येवून सदर चेन जमा केली.

# रस्त्यावरील खडी धोकादायक

### अपघाताला कारणीभूत ठरण्याची भीती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**सार्वजनिक बांधकाम विभागाने बेलोशी–वावे रस्त्याच्या कामासाठी रस्त्यावर खडी टाकून ठेवली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ही खडी तशीच पडून आहे. रस्त्यावरील खडी येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकी वाहन चालकांना धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. या खडीमुळे वाहन घसरून अपघात होण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे.**



अलिबाग तालुक्यातील बेलोशी ते वावे हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतो. या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले. या रस्त्यावरून वाहन चालविताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याचे काम अर्थसंकल्पातून मंजूर केले. लाखो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी गेल्या काही दिवसांपूर्वी या रस्त्याच्या बाजूला मोठी खडी टाकण्यात आली.परंतु ही खडी पडून राहिल्याने ती रस्त्यावर आली आहे.

महाजने बेलोशी, वावे, गंगेचीवाडी, दिवीवाडी, व इतर गावांमधून येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकी चालकांना या रस्त्यावरील खडीचा प्रचंड त्रास होत आहे. रस्त्यावर खडी आल्याने अपघात होण्याची भिती प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

> **बेलोशी – वावे रस्ता अर्थ संकल्पातून मंजूर झाला आहे. गेल्या काही दिवसांपुर्वी खडी टाकण्यात आली आहे. लवकरच कामाला सुरुवात केली जाईल. परंतू रस्त्यावर आलेल्या खडीमुळे दुचाकी चालकांना धोका निर्माण होत असल्यास ती खडी योग्य ठिकाणी साठवून ठेवण्याबाबत संबंधितांना सुचना करण्यात येईल.**
> **राजु डोंगरे – उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे. खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना चालकांना कसरत करावी लागत असताना रस्त्याच्या कामासाठी टाकलेली खडीचा वापर न झाल्याने ती खडी अपघाताला कारणीभूत ठरण्याची चिंता प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

# नवीन जेट्टीचे काम शेवटच्या टप्प्यात

### ■ महिन्याभरात लोकसेवेसाठी जेट्टी उपलब्ध होणार

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

सागरमाला व राज्य शासन यांच्या माध्यमातून नऊ कोटी रुपये निधी मंजूर करून महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडून मुरूड तालुक्यातील एकदरा ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदरातील नवीन जेट्टी विकसीत केली जात आहे.हे काम प्रगतीपथावर असून महिन्याभरात नवीन जेट्टी लोक सेवेसाठी उपलब्ध होणार असल्याने स्थानिक कोळी मच्छिमार बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मुरुड पर्यटक क्षेत्र असल्याने ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी रोज शेकडो पर्यटक राजपुरी व खोरा बंदर या जेट्टीवरुन किल्ला पाहण्यासाठी येत असतात परंतु खोरा बंदरातील जुनी जेट्टीची रुंदी व उंचीने कमी असल्याने किल्ल्यात जाण्यासाठी ओहोटीच्या वेळी पर्यटकांना उतरण्यासाठी व चढण्यासाठी खुप त्रासदायक होत आहे. त्याबरोबर मच्छिमार



बांधवांना बोटी किनाऱ्याला लावणे खूप कठीण होत आहे. विचार करून शासनाने नवीन जेट्टी कार्यान्वित करण्याचे काम हाती घेतले असून नवीन जेट्टी खोल समुद्रात १०० मीटर लांबी व १० मीटर रुंदीची नवीन जेट्टी उभारण्याकरिता निधी उपलब्ध करून दिला. आता या नवीन जेट्टीचे काम शेवटच्या टप्प्यात असून पंधरा दिवसात काम पूर्ण होईल. महिन्याभरात या नवीन जेट्टीवरुन पर्यटकांना जंजिरा किल्ल्यात व पद्मदुर्ग किल्ल्यात ये-जा करण्यासाठी खुला करण्यात येणार असल्याने हा प्रवास सुखकर होणार आहे.

खोरा जेट्टीचं काम 'द.एच. कंपनी पनवेल' ठेकेदार हेमांशु यांना देण्यात आले असून या कामाला सुरुवात १३ मार्च २०२३ या दिवशी करण्यात आली आहे. वर्षभरात ठेकेदारांनी १०० मीटर लांबीचं काम पूर्ण केले असून सध्या पर्यटकांना उतरण्यासाठी व चढण्यासाठी पायऱ्या व रेलिंगचे काम सुरू आहे. पंधरा दिवसात काम पूर्ण होईल. स्थानिक कोळी बांधवाना बोटी लावण्यासाठी व पर्यटकांसाठी महिन्याभरात सेवेसाठी जेट्टी लवकरच उपलब्ध होणार आहे. अशी माहिती उपअभियंता दिपक पवार यांनी दिली.

# सुकेळी येथे कारचा भीषण अपघात

**। सुकेळी । वार्ताहर ।**

मुंबई -गोवा महामार्गावर अपघातांची मालिका ही सुरुच असतानाच सुकेळी येथील जिंदाल कंपनीच्या समोर कार व ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन कार चालक गंभीररित्या जखमी झाला आहे. हा अपघात गुरुवारी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास घडला.



उपलब्ध झालेल्या माहितीनुसार सुकेळी येथिल जिंदाल कंपनीच्या समोर एस. एम. ट्रान्सपोर्ट कंपनीचा ट्रक क्रं. एम . एच. ४३ सी. के. १६९४ चालक हा आपल्या ताब्यातील ट्रक रस्त्याच्या बाजूला उभा करुन बाजुला असलेल्या दुकानामध्ये गेला होता. याचदरम्यान नागोठणे बाजूकडुन भरधाव वेगाने येणारी कार क्रं. एम.एच.२० जी.क्यु. ०४६० चालक विशाल रमेश कदम याचे आपल्या कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे कार सरळ जाऊन ट्रकच्या मागच्या बाजूला जाऊन धडकुन कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. कारमधिल एअर बॅग उघडल्यामुळे कार चालक बालंबाल बचावला मात्र त्याच्या डोक्याला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली होती.

यावेळी येथील स्थानिक युवा कार्यकर्ते सतिश सुटे, निखिल करंजे आदि ग्रामस्थांकडून कारमधील दुखापतग्रस्तांना प्रथमोपचारासाठी मदतीचा हात देऊन जिंदाल कंपनीच्या रुग्णवाहिकेतून जिंदाल रुग्णालयात नेण्यात आले. मात्र यावेळी ट्रक चालकाने तेथुन पळ काढला. यावेळी जिंदाल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी पनवेल येथे पाठविण्यात आले .

दरम्यान वाकण टॅबच्या सहायक पोलिस निरीक्षक गितांजली जगताप यांच्यासह त्यांचे संपूर्ण कर्मचारी तसेच नागोठणे पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्षदर्शींनी पाहणी करुन अपघातग्रस्त दोन्ही वाहने रस्त्यावरुन बाजुला करुन वाहतूक सुरळीतरित्या सुरू करण्यात आली. तसेच महामार्गावर सुकेळी जिंदाल कंपनीच्यासमोर कॉईल घेऊन जाणाऱ्या ट्रेलरच्या रस्त्यावर लांबच लांब रांगा लागत असुन त्यामुळेच या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघातात घडत आहेत त्याबाबतीत योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे स्थानिकांकडून बोलण्यात येत आहे. याबाबतीत नागोठणे पोलीस स्टेशनमध्ये फोन केला असता अपघातग्रस्त कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचे सांगण्यात आले.

## पनवेलमध्ये पेट्रोल पंप जाळण्याची धमकी

**नवीन पनवेल :** पेट्रोल दिले नाही या गोष्टीचा राग मनात धरून तिघांना हेल्मेटने मारहाण करून जखमी केले ही घटना तारा येथील पेट्रोल पंपावर घडली. या प्रकरणी चौघाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.विपुल उपाध्ये हे नायरा पेट्रोल पंप, तारा येथे काम करत असताना सौरभ संतोष पांचाळ हा त्याच्या मित्रांसोबत नायरा पेट्रोल पंप येथे पेट्रोल घेण्यासाठी आला. त्याला बाटलीत पेट्रोल दिले नाही या गोष्टीचा राग मनात धरून त्याने विपुल उपाध्ये, मॅनेजर आणि पेट्रोल पंप मालक यांना त्याच्याजवळ असलेल्या हेल्मेटने मारहाण करून दुखापत केली. पेट्रोल पंप जाळून टाकेल अशी धमकी देऊन शिवीगाळ केली. या प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये वेशभूषा स्पर्धा उत्साहात



**। उरण । वार्ताहर ।**

बी.एस. पाटील इंग्लिश मिडियम स्कूल विंधणे येथे वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्देश विद्यार्थ्यांना आपल्या देशातील विविध वेशभूषबददल माहिती करून घेणे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग घेणे हा आहे.

या स्पर्धेमध्ये आराध्य थळी, मायरा चित्तमपल्ले, श्रीजा जोशी, मितांश पाटील, शौनक पाटील, शौर्य पाटील, क्रिशा ठाकूर, क्रियांश नवाळी, रूद्रांश कोळी, मोक्षा जोशी, सायरा घरत, जियांश पाटील या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. देशात विविधतेत एकता आहे. त्याचे द्योतक ही स्पर्धा आहे, असे मत संस्थेचे अध्यक्ष कैलास पाटील यांनी व्यक्त केले. या वेशभूषा स्पर्धेत मितांश पाटील प्रथम, मायरा चित्तमपल्ले व श्रीजा जोशी द्वितीय क्रमांक, क्रिशा ठाकूर व क्रियांश नवाळी तृतीय क्रमांक प्राप्त केले.

## तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत तीस वर्षीय रवी कुमार पुजारा याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात वाहनचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. रवी कुमार पुजारा हा पळस्पे पनवेल येथे एडमिन डिपार्टमेंटचे कंपनीत काम करतो. हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकी घेऊन जेडब्ल्यूआर कंपनी पाडेघर या ठिकाणी कामानिमित्त गेला होता. काम संपवून तो ऑफिसला जेएनपीटी हायवेने परत येत असताना कळंबोलीकडे जाणाऱ्या सर्विस रोड कडे वळण्याचा अगोदर चिंचपाडा गावाजवळ जेएनपीटी हायवे वर आला असता दुचाकीला अज्ञात वाहन चालकाने मागील बाजूने ठोकर दिली. यात तो खाली पडला. त्यात तो गंभीर जखमी झाला.

# म्हसळा विंचूदंश प्रकरणी प्रशासकीय कारवाईचा बनाव ?

**। दिघी । वार्ताहर ।**

म्हसळा ग्रामीण रुग्णालयात झालेल्या विंचूदंश प्रकरणात सध्या तपास संथगतीने सुरु आहे. त्यामुळे आम्हाला न्याय कधी मिळणार असा प्रश्न मुलगा गेलेल्या वडिलांनी केला आहे. या घटनेवरून शासकीय रुग्णालयात काम करत असताना खाजगीत होणारी डॉक्टरांची प्रॅक्टिस चर्चेत येऊ लागली आहे. तर श्रीवर्धन रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधीक्षकांकडे म्हसळा ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारीपद दिल्याने नक्की कुणाला वाचवण्याचे प्रयत्न सुरु आहेत अशा संशय येऊ लागला आहे.

१२ नोव्हेंबर रोजी म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयात विंचुदंशाने मृत झालेल्या ४ वर्षीय मिहिर मनोहर कांबळे या बालकाचा मृत्यू झाला होता. डॉ मेहता यांनी रुग्णाला तपासण्यासाठी ५ तास उशीर केला आणि मिहिर ची प्रकृती अत्यवस्थ झाल्यावर वर पुढे पाठवून दिले असा आरोप मृत बालकाचे वडील करत आहेत. तशी त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये पोलिस प्रशासन अतिशय संथ गतीने तपास करत असून आरोग्य विभाग डॉक्टरांना वाचवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे परिणामी आम्ही दोघे भाऊ भाऊ अशीच काहीशी परिस्थिती या दोन्ही विभागांची झाली आहे. तसेच डॉ. मेहता यांचे अजूनही निलंबन झालेले नसून त्यांना माणगाव येथे कामावर रुजू करून घेण्यात आल्याने जिल्हा शल्य चिकित्सक आणि डॉ. मेहता यांनी मिळून मी मारल्याचे नाटक करतो तू रडण्याचे कर अशी परिस्थिती बनवली आहे

घटनेच्या दिवशी डॉ. मेहता सुट्टीवर होते असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी सांगितले. सध्या त्यांना माणगावला ड्यूटीसाठी हजर करून घेतले असून त्यांना निलंबित केलेले नाही. मात्र जर डॉ मेहता सुट्टीवर होते तर मग शवविच्छेदन म्हसळ्यात करण्यासाठी दबाव का आणत होते? याशिवाय त्यांनी त्यांची रजा कधी आणि कोणाच्या सहीने मंजूर करून घेतली होती हे प्रश्नही उपस्थित होत आहेत. प्रकरण शांत झाल्यावर कागदपत्रांमध्ये फेरफार करून रजेवर असल्याचा हा बनाव असून डॉ. मेहता आणि सिव्हिल सर्जन दोघांचीही चौकशी व्हावी ही मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे. प्राथमिक उपचार देणाऱ्या डॉ. पवन यादव यांनी सुद्धा बालकाला काय काय उपचार दिले, खरच दिले की फक्त कागदावरच उपचार दिल्याचे दाखवले याची सुद्धा चौकशी करण्याची मागणी नातेवाईक करत आहेत. आम्हा गरिबांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी मनोहर कांबळे यांनी केली आहे.

घटनेच्या दिवशी मी स्वतः सुद्धा ड्यूटीवर होतो. डॉ. मेहता सकाळी रुग्णभेटीला आले होते. विंचुदंशानंतर माझ्या मुलाला आणल्यानंतर डॉ. मेहतांना अनेक वेळा बोलावून सुद्धा आले नाहीत. म्हणून त्यांना बोलवायला मी त्यांच्या खासगी हॉस्पिटलमध्ये गेलो असता प्रशासकीय कागदपत्रांवर सुद्धा त्यांनी त्या दिवशी सह्या केल्या. विश्वजीत या लिपिकाकडे चौकशी केली असता त्याने डॉ. मेहता सुट्टीवर नसल्याचे मला आणि सोबतच्या गावकऱ्यांना सांगितले आहे, असे मनोहर कांबळे यांनी सांगितले.

> **घटनेच्या दिवशी डॉ. मेहता हे सुट्टीवर होते. गुन्हा दाखल असल्याने पोलीस तपास सुरु आहे तसेच शवविच्छेदन अहवाल प्रतीक्षेत आहे. सदर घटनेच्या तपासासाठी आम्ही चौकशी समिती गठीत केली आहे.**
> **– डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा शल्यचिकित्सक, अलिबाग**

# साजगांव यात्रेत उसळला गर्दीचा महापूर

### ■ धुळीमुळे अनेकांना नाहक त्रास

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

साजगांव यात्रेला कार्तिकी एकादशी पासून प्रारंभ झाला.मात्र विधानसभेच्या निवडणुकीमुळे जनता आपल्या नेत्याच्या प्रचारात दंग झाली असल्याचे चित्र पहावयास मिळत होते.मात्र मतदान झाले आणि या ठिकाणी गर्दीचा महापूर उसळल्याचे पाहावयास मिळाले.

सायंकाळी सहाच्यानंतर मोठ्या प्रमाणात यात्राप्रेमी याठिकाणी दाखल झाल्यामुळे रस्त्यावर तीन ते चार कि.मी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यात्रेमध्ये सायंकाळी थंडी जरी पडली असली तरी जाणवत नव्हती. मात्र या ठिकाणी प्रचंड धुळीत रुपांतर झाल्याचे पाहावयास मिळाले. गर्दीमधून चालत असताना निर्माण होणाऱ्या धुळीमुळे अनेकांना या ठिकाणी शिंका येत होत्या.तसेच आपली लहान मुले, आपले पैश्याचे पॉकीट, मौल्यवान वस्तू सांभाळून ठेवण्यांच्या सूचना ऐकण्यास मिळत असल्यातरी सुद्धा या धुळ आणी गर्दीमुळे अनेकांचा हिरमोड झाल्याच पाहावयास मिळाले.

# लाकडी गोदामाला लागली भीषण आग

### ■ लाखो रुपयांचे नुकसान

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसी नावडे फाटा जय मातादी हॉटेलजवळ असलेल्या बेकायदेशीर लाकडी गोदामाला लागलेल्या भीषण आगीत लाखो रुपयाचे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास या गोदामाला अचानकपणे आग लागली. आगीने रौद्ररुप धारण करताच परिसरातील नागरिकांनी तळोजा पोलीस ठाणे व अग्नीशमन दलाला या आगीबाबत कळविले. तातडीने पनवेल, तळोजा, कळंबोली परिसरातील अग्नीशमन बंब घटनास्थळी रवाना झाले व त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून ही आग आटोक्यात आणली. या आगीत लाखो रुपये किंमतीचे लाकडी सामान व इतर वस्तू भस्मसात झाल्या असून जिवीत हानी झाली नाही आहे. परंतु या परिसरातील अशा प्रकारे बेकायेशीर गोदाम उभारण्यात आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भितीयुक्त वातावरण असून महापालिकेने अशा गोदामांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी येथील रहिवाशी करीत आहेत.

## ग्राहकांसाठी बैठकीचे आयोजन

**पेण :** स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखेकडून ग्राहकांच्या सोईसुविधांबाबत सुचना व सल्ले जाणून घेण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल क्षेत्राने आपल्या ग्राहकांसाठी टाउन हॉल बैठकीचे आयोजन केले आहे. स्थळ दुसरा मजला, स्टेट बँक ऑफ इंडिया, पनवेल मुख्य शाखा, पंचरत्न हॉटेल समोर बैठकीचे आयोजन केले असून जास्तीत जास्त ग्राहकांनी या बैठकीमध्ये सहभागी होउन आपल्या सुचना अगर बँकेच्या सेवेबाबत असलेल्या अपेक्षा व्यक्त कराव्या जेणेकरुन बँक व्यवस्थापनेला भविष्यात सुधारणा करता येतील, असे बँक शाखाप्रमुखांनी सांगितले.

### कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांची गैरसोय होणार दूर

# हमीभावाने भात खरेदी केंद्र सुरु

**। कर्जत । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात भाताची शेती खरीप हंगामात केली जाते. शेतकऱ्यांच्या घरात भाताच्या राशी साठून राहिल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याने जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडून भाताची हमीभावाने खरेदी करण्याच्या सूचना खरेदी विक्री संघाला केली. त्यानुसार कर्जत तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड या संस्थेकडून भाताची हमीभावाने खरेदी करण्याचे काम सुरु झाले आहे. शेतकऱ्यांनी




आणलेल्या भाताचे पूजन करून आणि नंतर वजन करून हमीभावाने भाताची खरेदी कर्जत खरेदी विक्री संघात सुरु झाली आहे.

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह अँड मार्केटिंग फेडरेशन लिमिटेडकडून भात आणि धान यांची हमीभावाने खरेदी करण्याचे आदेश जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांना दिले आहेत.

त्यानुसार कर्जत तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड या संस्थेकडून भाताची हमीभावाने खरेदी प्रक्रिया सुरु केली आहे.या उपक्रमाची सुरुवात कर्जत खरेदी विक्री संघात करताना शेतकऱ्यांनी आणलेल्या भाताचे पूजन करून आणि वजन करून भाताची खरेदी सुरु झाली आहे.

**भाताची श्रेणी...**

साधारण .. २३०० रुपये
अ दर्जा .. २३२० रुपये

**आवश्यक कागदपत्र ...**

२०२३–२४ मधील पीक पाणी नोंद असलेला सातबारा उतारा
गाव नमुना ८ अ
बँक पासबुक
आधारकार्ड
हमी पत्र
आधार कार्ड लिंक असलेला मोबाईल नंबर

# विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये 'सिक रुम'

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**आजारी विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये तातडीची प्रथमोपचार वैद्यकीय व्यवस्था उपलब्ध कराव्यात. या शाळांत संबंधित प्राधिकरणांच्या मानकांनुसार आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी फर्स्ट एड किंवा 'सिक रूम' उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने सर्व शाळांना दिले आहेत.**



राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या सर्व शाळांमध्ये दररोज किमान सहा ते सात तास विद्यार्थी उपस्थित असतात. या कालावधीत काही विद्यार्थ्यांना तातडीच्या वैद्यकीय उपचारांची गरज भासू शकते. अशावेळी शाळेनजीक वैद्यकीय सुविधा असेलच असे नाही. त्यामुळे, अशा परिस्थितीत शाळा प्रशासनाकडे प्रथमोपचार पेट्या, कृत्रिम श्वासोश्वास तसेच शाळेकडे वाहनांची सोयी-सुविधा उपलब्ध असाव्यात. समयसूचकता दाखवून तातडीने आवश्यक कार्यवाही केल्यास विद्यार्थ्याला वैद्यकीय मदत मिळाल्यास अघटित घटना टाळता येऊ शकते, असे निर्देशात शालेय शिक्षण विभागाने म्हटले आहे.

**समुपदेशकाची व्यवस्था करावी**

आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्याची गरज भासल्यास शाळेकडे वाहनाची व्यवस्था असावी. विद्यार्थ्यांकरिता शाळा स्तरावर तणावमुक्तीसाठी कार्यशाळा आणि इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशकाची व्यवस्था करावी. या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत संचालक, उपसंचालकांनी मासिक आढावा घ्यावा. आवश्यकतेनुसार शिक्षणाधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांना मागदर्शन करणे देखील बंधनकारक आहे, असेही शालेय शिक्षण विभागाने आदेशात म्हटले आहे.

**अशा आहेत सूचना**

**तपासणी शिबिरामध्ये तातडीचे प्रथमोपचार देण्याबाबत प्रशिक्षण दिले जावे, शाळेनजीकची शासकीय रुग्णालये, आरोग्य केंद्र, खासगी दवाखाने आणि रुग्णवाहिकांचे संपर्क क्रमांक ठळक अक्षरांत दर्शनी भागांत लावण्यात यावेत. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शाळेत आवश्यकतेनुसार समन्वयक नेमण्यात यावेत. रुग्णास तत्काळ उपचार मिळण्याच्यादृष्टीने समन्वयकाने रुग्णालयांशी संपर्क साधावा. आजारी विद्यार्थ्यांस रुग्णालयात भरती करण्यात मदत करावी. डॉक्टर अथवा दवाखान्यांशी ऑन कॉल वैद्यकीय सेवा देण्याबाबत सामंजस्य करार करावेत. विद्यार्थ्यांना गरजेनुसार शाळेने डॉक्टर ऑन कॉल सुविधा उपलब्ध द्यावी.**

# माणगावमध्ये धुक्यासह हुडहुडी वाढली

**पारा १९ अंशाखाली; विकेंडला पर्यटनस्थळावर पर्यटकांची गर्दी**

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगावमध्ये थंडीचा कडाका जाणवू लागला असून, तापमान १९ अंशाखाली आले आहे. गेल्या चार दिवसांत तापमानात चांगलीच घट झाली आहे. त्यामुळे गारठा मोठ्या प्रमाणावर वाढला असून, अनेकांनी गरम कपडे वापरण्यास सुरुवात केली आहे. मोर्बा रोडवर सकाळी धुक्याची चादर पसरल्याचा अनुभव नागरिकांना मिळत आहे.

लांबलेल्या पावसामुळे परिसरातील शेती आणि मळरानावरील जमिनीत अद्यापही ओलावा असल्याने परिसरात गारवा जाणवत आहे. त्यामुळे दिवाळीनंतर माणगावमध्ये दाट धुक्याची चादर सर्वत्र पसरलेली पाहायला मिळत आहे. मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांना पसरलेल्या या दाट धुक्याचा मनमुराद आनंद घेता येत आहे. गेल्या काही दिवसापासून शहरातील तापमान १९ अंशाखाली गेले आहे. त्यामुळे अनेकांनी कपाटात ठेवलेले गरम कपडे बाहेर काढून वापरण्यास सुरुवात केली आहे, मात्र या धुक्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे.

धुके असल्यामुळे कामानिमित्त बाहेर पडलेल्या चालकांना वाहन चालवणे कठीण जात आहे. या धुक्यांमुळे सकाळच्या सत्रात काही विशिष्ट अंतरावरील दृश्य अगदीच पुसट दिसत असल्याने अपघाताची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, परतीच्या पावसाने आता रजा घेतल्यामुळे तालुक्यात सम ाधानकारक वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरीवर्गाचीही कापणीची लगबग आटोपलेली आहे. शनिवार, रविवार विकेंडला मुंबई-पुण्याहून येणारे पर्यटक या गुलाबी थंडीची मज्जा लुटताना दिसून येत आहे.

# फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याला २४ लाख निधी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान कार्यक्रमांतर्गत २०२४-२५ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी २४ लाखाचा कार्यक्रम जिल्ह्यासाठी मंजूर आहे. या प्रवर्गासाठी मंजूर कार्यक्रमाच्या तुलनेत खर्च व प्राप्त अर्जाचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे निदर्शनास येत आहे. यास्तव क्षेत्रीय स्तरावरून या प्रवर्गातील लाभार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज प्राप्त करून घेण्यासाठी २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत क्षेत्रीय गावपातळीपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या कार्यक्रमामध्ये विविध बाबींचा समावेश आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका, क्षेत्रविस्तार घटकांतर्गत ड्रॅगनफ्रूट या एक्सॉटिक फ्रूट क्रॉप, पुष्पोत्पादन, फळपिके, मसाला पिके, अळिंबी उत्पादन, जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन, सामूहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, नियंत्रित शेती (ग्रीनहाऊस, शेडनेट, प्लास्टिक मल्चिंग), फलोत्पादन यांत्रिकीकरण, मुनष्यबळ विकास कार्यक्रम, काढणीत्तोर व्यवस्थापन (पॅक हाऊस, प्रक्रिया युनिट, रायपनिंग चेंबर) आणि पणन सुविधा आदी विविध बाबींचा समावेश आहे. यामध्ये या वर्षी प्रामुख्याने मधुमक्षिका पालनासाठी तरतूद केली आहे. या योजनेमध्ये सहभाग घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर अर्ज करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या नजीकच्या आपले सरकार ई-सेवा केंद्रामध्ये जाऊन किंवा https://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवरदेखील अर्ज करता येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फलोत्पादनाशी निगडित योजनांचा लाभ घेणे आवश्यक आहे. योजनेच्या अधिक माहितीसाठी गावपातळीवरील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक तसेच मंडळ कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी किंवा जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी केले आहे.

# उरणमध्ये भातकापणीला वेग

**मजुरांच्या कमतरतेमुळे शेतकरी चिंतातूर**

**। उरण । वार्ताहर ।**

शेतकऱ्यांना भातपीक कापण्यासाठी मोठी मजुरी देऊनही मजुरांचा अभाव भासू लागला आहे. मजुरांअभावी भातपिकांची कापणी वेळेवर होत नसल्यामुळे येथील शेतकरी चिंतातूर झाला आहे.

निसर्गचक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे भातपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने शेतकरीवर्गात नाराजी पसरली होती, मात्र आता उरलेल्या भातपिकाच्या कापणीसाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे, परंतु भातकापणीकरिता मजूर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे नाइलाजाने शेतकरी कुटुंबातील नातेवाइकांच्या मदतीने भातकापणी करू लागले आहेत. भातकापणी झाल्यानंतर भातपिकांची आरवे चार दिवस चांगली वाळल्यानंतर त्याचे भारे बांधून ते उडव्यात रचून ठेवले जातात. त्यानंतर शेतातच खला तयार करून त्याचे व्यवस्थित शेणाने सारवण करून त्यानंतर मळणी प्रक्रिया केली जात होती, परंतु सध्याच्या लहरी पावसाच्या भीतीने वर्षभर केलेले कष्ट व त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जाऊ नये म्हणून शेतकरी भातपीक न वाळवताच व त्याची साठवणूक न करताच ताबडतोब ताडपत्रीवर झोडून करून भात घरी आणत आहेत.

मागील काही वर्षांपासून शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळ्या माध्यमातून नुकसान होत होत. त्यातच भातशेती ही पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओला, तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमिनी लागवडीखाली न आणता त्या ओसाड ठेवल्या आहेत, तर ज्या शेतकऱ्यांनी शेती केली आहे, त्यांना वेळेवर मजूर मिळत नसल्यामुळे कापणीची कामे खोळंबली आहेत.

# शेख यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**पनवेल :** येथील ज्येष्ठ साहित्यिक ए.के.शेख यांच्या दिव्य कुरआन - मराठी अनुवाद या पुस्तकाचे प्रकाशन ३० नोव्हेंबर रोजी पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे सायंकाळी ४.०० वा. पार पडणार आहे. या प्रसंगी सईद मुल्ला, डॉ. इकबाल मित्रे, अली एम शम्सी, मुफ्ती मोहम्मद रझी कडवई, ड़ॉ. मोहम्मद अस्लम खान, मोहम्मद जावेद शेख, रोहिदास पोटे हे मान्यवरही उपस्थित राहणार असल्याचे आय के शेख, हमीद शेख, वाय के शेख, डॉ.समीर शेख यांनी कळवले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मोहमंद अल्ली सालेह मोहमंद खान | ४७० | २३ | २६५ चौरस मिटर | २६ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड

सही / -
**अल्पेश अनंत कराळे**
(अॅडव्होकेट)
दिनांक :- २४/११/२०२४
मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक निक्की खेमचंद भागनानी यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत बोलणी आमचे आशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये चालु आहेत. मिळकतीचे वर्णन:-

| गावाचे नांव व स्थानिक नांव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र व हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड | ४८८ | १.३०.३०<br>पो.ख. ०.०४.५०<br>१.३४.८० | ९.८५ |

सदर मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालिल सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबत भरवसा विद्यमान मालकानी आमचे आशिलांना दिला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतीबाबत आमचे आशिल विद्यमान मालकांबरोबर वर नमुद मिळकतींबाबत व्यवहार करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२४.११.२०२४

सही/-
**श्री. अमित महेश्वर देशमुख**
वकील व नोटरी पब्लिक,
पत्ता - शॉप नं. ४ व ५, सृष्टी बिल्डींग वेधशाळेसमोर, अलिबाग, मु. पो. ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

काटकर ए.एम
वादी तर्फे वकील

## जाहीर नोटीस

नि. ३७/ड

पेण येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ५/२०१९

सुमती भगवान जाधव
पूर्वाश्रमीची कलावती गणपत भऊड — वादी
विरुद्ध
१. विठ्ठल गणपत भऊड
२. शरद वसंतराव मोरे
३. सोनाली शरद मोरे — प्रतिवादी
४. स्वप्नील शरद मोरे
५. समर शरद मोरे
नंबर २ ते ५ रा. १०४, 'यशोदीप' अमृतनगर
मुंबई-पुणे रोड, ठाणे

या जाहीर नोटीसीने प्रतिवादी नं. २ ते ५ यांना कळविण्यात येते की, वादी यांनी सदरचा दावा, दावा मिळकतीचे वाटप करून स्वतंत्र ताबा निर्तुटक करून मिळणेसाठी, दिनांक ९-१-२००६ रोजीचे तथाकथित मृत्युपत्र रद्द करून मिळणेकरीता, दिनांक ६-१०-२००६ रोजीचे खरेदीखत वादीवर बंधनकारक नाही असे ठरवून मिळणेकामी दिनांक १८-११-२०१५ रोजीचे खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही असे ठरवून मिळणेसाठी व दिनांक १५-२-२०१३ रोजीचे खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही असे ठरवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. २ ते ५ यांचे दिनांक ६-१०-२००६ रोजीचे तथाकथित खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही असे ठरवून मिळण्यासाठी वादी यांनी दावा दाखल केला आहे. सदरच्या तथाकथित खरेदीखतात प्रतिवादी नं. २ ते ५ यांनी जो पत्ता दिला आहे तोच पत्ता वादी यांनी दाव्यात नमूद केला आहे. प्रतिवादी नं. २ ते ५ यांना सदरच्या पत्त्यावर वारंवार समन्स काढूनही ते समन्सची बजावणी करून घेत नाहीत व समन्स घेण्याचे टाळाटाळ करीत आहेत. सबब वादी यांनी दाव्यात दिलेल्या प्रतिवादी पत्त्यावर नं. २ ते ५ यांच्या राहत्या घरावर दाव्याचे समन्स डकवून बजावणी करण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल केला. सदरच्या अर्जाप्रमाणे निशाणी ३३ कडे बेलिफचा रिपोर्ट आलेला आहे. सदरच्या रिपोर्टमध्ये बेलिफ यांनी असे नमूद केले आहे की,'सदरच्या पत्त्यावर मोहम्मद हारूण हा पाच वर्षापासून भाडेकरू आहे. या घराचा मालक पपूलाल पठाम आहे. मोहम्मद हारूण यांनी ५X१७ प्रमाणे समन्स डकवण्यास मनाई केली. सबब समन्स न बजावता परत' असे बेलिफ रिपोर्टमध्ये नमूद केले आहे. सबब प्रतिवादी नं. २ ते ५ यांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः अगर तुम्ही नेमलेले प्रतिनिधी किंवा वकील यांचेमार्फत पेण येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दिनांक १३-१२-२०२४ रोजी सकाळी १०-३० वाजता हजर रहावे व आपली कैफियत मांडावी. अन्यथा तुम्हास सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी आपल्या विरुद्ध एकतर्फी घेऊन निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२-११-२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

| सही/- | सही/- |
|---|---|
| कनिष्ठ लिपिक | अधिक्षक |
| सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन पेण | सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन पेण |

## Public Notice

Notice is hereby given on behalf of and on the instructions of Maestro Logistics Private Limited, having office at Unit No. 303 & 304, Raheja Plaza, Shah industrial Estate Area, Off Veera Desai Road, Andheri (West), Mumbai, Maharashtra, India- 400053 (**"Owner"**) being the owner of land bearing Gat No. 193 admeasuring 2 Hectares 18.7 Ares (earlier bearing Gat No. 591 and prior thereto bearing Survey No. 92/2B1) situated at Village Kihim, Panchayat Samiti Taluka Alibag, District Raigad, Maharashtra, and more particularly described in the **Schedule 1** here- under written **("Said Property")** that the original documents pertaining to the said Property as set out in the **Schedule 2** hereunder written (**"Original Documents"**) are lost and/or misplaced and not traceable in the records of the Owner. The Owner has, in relation to such missing Original Documents, Going to lodge a police complaint with Alibag police station.

The Owner further has confirmed that none of the Original Documents are or were at any given time deposited in the custody/possession of any other person, entity, bank or financial institution including but not limited for the purpose of creating any encumbrance, charge, mortgage or third party rights over the said Property, and that no loan has been availed in exchange for the original Documents or as security for the Property.

No person, entity, firm, or institution (corporate or otherwise) should deal with, use or transact in any manner, on the basis of the Original Documents, with respect to the said Property or any portion thereof. Any person, entity, firm, or institution (corporate or otherwise) claiming to be in possession of any of the Original Documents relating to the said Property or being in custody of the Original Documents or finding the Original Documents or having any knowledge thereof or having any claim over such Original Documents or claiming rights hasis the same is hereby called upon to contact the undersigned and handover the Original Documents at the earliest and within fourteen (14) days from the date of this notice, after which no claim will be entertained in that behalf and shall be deemed to have been waived and/or abandoned. In the event any person, entity, firm, or institution (corporate or otherwise) misuses the Original Documents, the Owner (and any of its successors-in-interest) shall be constrained to take legal action against such person, entity, firm, or institution (corporate or otherwise).

**SCHEDULE I**
**(Description of the Schedule Property)**

All that piece and parcel of land bearing Survey No. 193 admeasuring 2 Hect-ares 18 Ares 7 Points (earlier bearing Gat No. 591, prior thereto bearing Survey No.92/281 and earlier forming part of Survey No. 92/2B), situated at Village Kihim, Gram Panchayat Kihim, and Panchayat Samiti Alibag. Taluka Alibag, District Raigad, Maharashtra and bounded as under:
On or towards the North : Gat No. 30
On or towards the East : Gat No, 194 & 195 (Part)
On or towards the West : Gat No. 36+33+324
On or towards the South : Gat No. 324

**SCHEDULE 2**
**(List of Original Documents)**

| Sr. | Document details | Name of Parties to the Document |
|---|---|---|
| 1. | Sale Deed dated 15 April 1969 pertaining to Survey No. 92/2B (referred to in Mutation Entry No. 4344 dated 25 August 1969). | Vendors:<br>(1) Sridhar Gangadhar Karve,<br>(ii) Parsharam Shridhar Karve,<br>(iii) Vasant Shridhar Karve and<br>(iv) Vinaykumar/Vijaykumar Shridhar Karve. Purchasers:<br>(i) Bhikaji Mahadev Néman,<br>(ii) Vishnu Bhikaji Neman. |
| 2. | Sale Deed dated 7 August 1986 (date reflected as 15 July 1986 in certain documents) pertaining to Survey No. 92/2B1(referred to in Mutation Entry No. 5185 dated 13 August 1986). | Vendor:<br>Vishnu Bhikaji Neman...<br>Purchaser:<br>Mahmad<br>Yusuf Ahmed. |

Alibag
Date : 24 /11/ 2024

sign/-
**Adv. Machhindra Mhatre**
Mob. No. 9272170009
Address: Shop No. 2, Angre Comp, Opp. Sub.. Registar Office Alibag Tal Alibag, Dist. Raigad, pincode no : 402 201, Email address: advmsmhatre@gmail.com

## जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्यांना सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलाच्या वतीने श्रीमती सरोजिनी राहुल नार्वेकर यांचे हक्क, पद आणि हित तपासत आहोत, ज्यांनी आम्हाला कळविले आहे की, त्या जमिनीच्या तुकड्याचे पूर्ण मालक आहेत ज्याचे वर्णन येथे खाली लिहिलेल्या पहिल्या परिशिष्टात केलेले आहे ("जमीन १") आणि ते कोणत्याही स्वरूपाच्या सर्व भारांपासून मुक्त आहे आणि आम्ही (१) श्री. नवीन युगराज जैन, (२) श्री. वसंत माणिकलाल बोकारिया, (३) श्री. राजीव माणिकलाल बोकारिया आणि (४) सौ. हर्षा संजय सिरोया यांचे हक्क, पद आणि हितसंबंधदेखील तपासत आहोत, ज्यांनी आम्हाला सूचित केले आहे की, ते जमिनीच्या पार्सलचे पूर्ण मालक आहेत ज्यांचे येथील खाली लिहिलेल्या ("जमीन २") विशेषतः दुसऱ्या परिशिष्टात वर्णन केले आहे आणि ते कोणत्याही स्वरूपाच्या सर्व भारांपासून मुक्त आहे. जमीन १ आणि जमीन २ यापुढे एकत्रितपणे "जमिनी" म्हणून संबोधले जातील.

सर्व आणि कोणतीही व्यक्ती/जमिनी किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा त्यासंबंधीचा कोणताही हक्क, अधिकार, मागणी, हिस्सा, मालमत्ता, लाभ किंवा हितसंबंध किंवा कोणत्याही एफएसआय किंवा त्याच्या विकासाची क्षमता, वारसा, विक्री, हस्तांतरण, वाहतूक, वाटा, गहाण, शुल्क, कर्ज, अग्रीम, रिलीज, त्याग, भाडेपट्टी, रजा आणि परवाना, काळजी घेणारा आधारावर, धारणाधिकार, योजना, असाइनमेन्ट, भाडेकरू, भेट, देवाणघेवाण, भार, कुटुंब व्यवस्था/सेटलमेन्ट, कर्जाची पूर्तता, इच्छापत्र, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, सुलभता, ट्रस्ट, ताबा, व्यवसाय, डिक्री, आदेश किंवा कोणत्याही न्यायालयाचा निवाडा, न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण किंवा लवाद, करार/ करार/ विक्री करार, कन्व्हेयन्स, करार, सामंजस्य करार, इरादा पत्र / टर्म शीट / अटीचे शीर्षक, विकास हक्क, भागीदारी, राइट ऑफ वे, लीस पेण्ड्स, आरक्षण, मुखत्यारपत्र, पर्याय, प्रथम नकाराचा अधिकार, अगोदर किंवा कोणतीही जबाबदारी किंवा कोणतीही वचनबद्धता किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाची, वा मार्गाने असो, येथे प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर, लिखित स्वरूपात, सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह ज्याच्या आधारावर असे दावे, मागण्या किंवा हक्क केले जात आहेत किंवा प्रयत्न केले जात आहे, ती माहिती देणे आवश्यक आहे. असे न केल्यास असे सर्व हक्क, दावे, मागण्या, शेअर्स, इस्टेट्स, फायदे आणि / किंवा व्याज माफ केले गेले आहे असे मानले जाईल आणि आमच्या अशिलावर बंधनकारक असणार नाही, जो कोणत्याही संदर्भाशिवाय / त्याचा विचार न करता जमिनीचे अधिग्रहण करण्यास पुढे जाईल.

**येथील वरील संदर्भित पहिले परिशिष्ट**
**("जमीन १"चे वर्णन )**

गाव सातिर्जे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, गट क्र. ३१२ मोजमापे ३५ गुंठा धारण जमीन आणि गाव झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित गट क्र. ३७९ / २ (जुना गट क्र. ५१९/(बी)/२ असलेला) मोजमापे ८४-२० गुंठा चौरस मीटर, गट क्र. ३८० (भाग) (जुना गट क्र. ५२० असलेला) मोजमापे ४३-१० गुंठा चौरस मीटर आणि गट क्र. ३८३/२ (जुना गट क्र. ५२४/(बी)/२ असलेला) भाग मोजमापे ६३ गुंठा धारण जमिनीचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.

**येथील वरील संदर्भित पहिले परिशिष्ट**
**("जमीन २"चे वर्णन )**

गाव सातिर्जे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, गट क्र. ३११ मोजमापे २८-१० गुंठा धारण जमीन आणि गट क्र. ३१० मोजमापे ३४ गुंठा, गट क्र. ३०९ मोजमापे ४० गुंठा धारण जमीन आणि गाव झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित गट क्र. ३८० (भाग) (जुना गट क्र. ५२० असलेला) मोजमापे ७३-४० गुंठा चौरस मीटर, गट क्र. ३८१/१ (जुना गट क्र. ५२१/१ असलेला) मोजमापे ४२-८० गुंठा चौरस मीटर धारण जमिनीचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.

दिनांकित २३ नोव्हेंबर २०२४

सही/-
**कु. अनुजा केडिया**
वरिष्ठ भागीदार
मेसर्स परिणाम लॉ असोसिएट्स
४ था मजला, एक्स्प्रेस टॉवर्स, रामनाथ गोएंका मार्ग,
नरिमन पॉइन्ट, मुंबई-४०० ०२१

## सार्वजनिक सुचना

युनिट क्रमांक ३०३ आणि २०४ रहेजा प्लाझा, शाह इंडस्ट्रियल इस्टेट एरिया, ऑफ बीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत येथे कार्यालय असलेल्या मेस्ट्रो लॉजिस्टिक प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने आणि निर्देशानुसार याद्वारे नोटीस देण्यात आली आहे. ४०००५३. ('मालक') गट क्रमांक १९३ मोजणाऱ्या जमिनीचा मालक असल्याने गाव किहीम, पंचायत समिती अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेले २ हेक्टर १८.७ आरएस (आधीचा गट क्रमांक ५९१ आणि त्यापूर्वीचा सर्व्हे क्रमांक ९२/२ ब १ आणि विशेषतः येथे अनुसूची १ मध्ये वर्णन केलेले आहे. लिखित ("साहित्य मालमत्ता") अंतर्गत मूळ कागदपत्रे संबंधित शेड्यूल २ मध्ये नमूद केल्यानुसार या मालमत्तेवर लिखित ("मूळ दस्तऐवज") हरवले गेले आहेत आणि/किंवा चुकीच्या ठिकाणी आहेत आणि मालकाच्या रेकॉर्डमध्ये शोधता येणार नाहीत. मालकाने, अशा गहाळ मूळ कागदपत्रांच्या संबंधात, गहाळ कागदपत्रांच्या अनुषंगाने मूळ दस्तऐवजांबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात पोलीस तक्रार दाखल करण्यास जात आहे. मालकाने पुढे पुष्टी केली आहे की कोणतेही मूळ दस्तऐवज कोणत्याही वेळी इतर कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक किंवा वित्तीय संस्थेच्या ताब्यात/ताब्यामध्ये जमा केलेले नाही किंवा नाहीत परंतु कोणताही भार, शुल्क निर्माण करण्याच्या उद्देशाने मर्यादित नाहीत, सांगितलेल्या मालमत्तेवर गहाण किंवा तृतीय पक्षाचे अधिकार आणि मालमत्ता मूळ कागदपत्रांच्या बदल्यात किंवा सुरक्षा म्हणून कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

कोणतीही व्यक्ती, संस्था, फर्म किंवा संस्था (कॉर्पोरेट किंवा अन्यथा) मूळ दस्तऐवजांच्या आधारे, उक्त मालमत्तेशी किंवा तिच्या कोणत्याही भागाशी संबंधित कोणत्याही प्रकारे व्यवहार करू नये, वापरू नये किंवा व्यवहार करू नये. कोणतीही व्यक्ती, संस्था, फर्म किंवा संस्था (कॉर्पोरेट किंवा अन्यथा) सांगितलेल्या मालमत्तेशी संबंधित कोणत्याही मूळ दस्तऐवजांच्या ताब्यात असल्याचा दावा करणारी किंवा मूळ दस्तऐवजांच्या ताब्यात असल्याचा दावा करणारी किंवा मूळ कागदपत्रे शोधणे किंवा त्याबद्दल कोणतेही ज्ञान असणे किंवा अशा मूळ दस्तऐवजांवर किंवा हक्काच्या आधारावर कोणताही दावा असल्यास याद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन केले जाते. खाली स्वाक्षरी करून मूळ कागदपत्रे लवकरात लवकर आणि या नोटीसच्या तारखेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत हस्तांतरित करा. त्यानंतर त्या बाजूने कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही आणि तो माफ केला गेला आणि/किंवा सोडला गेला असे मानले जाईल. जर कोणतीही व्यक्ती, संस्था, फर्म किंवा संस्था (कॉर्पोरेट किंवा अन्यथा) मूळ दस्तऐवजांचा गैरवापर करत असेल तर मालक (आणि त्याचे कोणतेही उत्तराधिकारी हितसंबंध अशा व्यक्ती, संस्था, फर्म विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यास प्रतिबंधित असेल किंवा संस्था (कॉर्पोरेट किंवा अन्यथा).

**शेड्यूल १**
**(शेड्यूल प्रॉपटीचे वर्णन)**

२ हेक्टर १८ आर ७ पॉइंट्सचे मोजमाप असलेले सर्वे नं. १९३ चे सर्व तुकडा आणि पार्सल (आधीचा गट क्रमांक ५९१ त्यापूर्वी सर्व्हे क्रमांक ९२/२ ब १ आणि त्यापूर्वी सर्व्हे क्रमांक ९२/२ ब चा भाग होता). गाव किहिम, ग्रामपंचायत किहिम येथे स्थित आहे आणि पंचायत समिती अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि सीमा खालीलप्रमाणे:
उत्तर दिशेला : गट क्रमांक ३०
पूर्व दिशेला : गट क्रमांक १९४ आणि १९५ (भाग)
पश्चिम दिशेला : गट क्रमांक ३६+३३+३२४
दक्षिण दिशेला : गट क्रमांक ३२४

**शेड्यूल २**
**(मूळ कागदपत्रांची यादी)**

| क्र. | दस्तऐवज तपशील | दस्तऐवजातील पक्षांचे नाव |
|---|---|---|
| १. | सर्व्हे क्रमांक ९२/२ब शी संबंधित दिनांक १५ एप्रिल १९६९ चे खरेदीखत (२५ ऑगस्ट १९६९ रोजी फेरफार क्रमांक ४३४४ मध्ये संदर्भित). | विक्रेते:<br>(१) श्रीधर गंगाधर कर्वे.<br>(२) परशुराम श्रीधर कर्वे.<br>(३) वसंत श्रीधर कर्वे आणि<br>(४) विनयकुमार/विजयकुमार श्रीधर कर्वे.<br>खरेदीदार:<br>(१) भिकाजी महादेव नेमण.<br>(२) विष्णू भिकाजी नेमण |
| २. | सर्व्हे क्र. ९२/२ ब १ शी संबंधित ७ ऑगस्ट १९८६ (विशिष्ट दस्तऐवजांमध्ये १५ जुलै १९८६ अशी तारीख दर्शविलेली) खरेदीखत (मध्ये संदर्भित) फेरफार क्रमांक ५१८५ दिनांक १३ ऑगस्ट १९८६). | विक्रेता<br>विष्णू भिकाजी नेमण<br>खरेदीदार:<br>महमद<br>युसूफ अहमद. |

अलिबाग
दिनांक : २४-११-२०२४

सही/-
**अॅड. मच्छिंद्र म्हात्रे**
मोबा. नं: ९२७२१७०००९
पत्ता : शॉप नं. २ आंग्रे कंपाऊंड दुय्यम निबंधक कार्यालय समोर अलिबाग, जि. रायगड, पिनकोड : ४०२२०१
ई-मेल: advmsmhatre@gmail.com

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नोंदणी. ५० शाखा-वेबसाईट नोंदणीसाठी-९२२६७६६१२९,९३७०५१७९४९
- weight loss by 6 Natural Therapies (No madicine-No Exercise-No suppliment) wellness clinic-9226766129
- गाळा भाड्याने देणे आहे. पी.एन.पी.मध्ये कलावती भाजी भंडारच्या बाजूला, अलिबाग संपर्क : ७३०४८५२३१५/९६०४१३८८२६
- सन स्टोन रीयल इस्टेट, साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- इलेक्ट्रिशन पाहिजे, २ ते ३ वर्षाचा अनुभव. ८८८८६०५२५९
- वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार-१२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी संपर्क - ९८२३५८५३२१
- वर्कशॉमध्ये कामासाठी मुले पाहिजेत शिक्षण ITI कोणत्याही ट्रेड्चा पगार- १२००० /महिना ८ तास ड्युटी संपर्क - ९०४९६५५५२३
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी गरजू (हेल्पर) मुले हवी आहेत. चेंढरे-अलिबाग. ९२७०६१४०७७.
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. हाऊस कीपर, नाईट शिफ्ट हाऊस कीपर, वेटर ० ते २ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग एस.टी.स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- नागावमधील हॉटेलमध्ये ऑलरॉऊंडर कुक, कॅप्टन, वेटर आणि हाऊसकिपर इत्यादी कामासाठी माणसे पाहिजेत. (पार्ट टाईम काम सुद्धा मिळेल.) मो.९९२१९७८०८०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ नोव्हेंबर

१) श्री. यशवंत काशिनाथ पाटील मु.परहुर, अलिबाग, २४-११-१९३१

२)श्री.जगदीश रामचंद्र नागे मु.वरसोली, अलिबाग २४-११-१९५७

३)श्री.उदय चिंतामण जोशी अलिबाग, २४-११-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## ब्लॅकने गुटख्याची विक्री

**रत्नागिरी :** जिल्ह्यात छुप्या मार्गाने बंदी असलेल्या गुटख्याची जोरदार विक्री सुरूच आहे. निवडणुकीच्या काळात पोलिस आणि प्रशासनाकडून होणाऱ्या वाहनांच्या तपासणीमुळे या मालाचा तुटवडा भासत आहे. विक्रेत्यांनी त्याचा फायदा घेत ब्लॅकने गुटख्याची विक्री सुरू आहे. २५ रुपयाला मिळणारी गुटख्याची पुडी आता ३० रुपये झाली आहे. गुटखा विक्री होत असतानाही कारवाई होताना दिसत नाही.

# टेंभोडे येथील रस्त्याची दुरवस्था

**। पालघर । प्रतिनिधी ।**

**पालघर नगरपरिषद क्षेत्रातील टेंभोडे येथील मराठी शाळा ते तलावपाडा रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवर मोठमोठाले खड्डे पडले आहेत. नगर परिषदेने हे खड्डे बुजवणे अपेक्षित असताना अजूनपर्यंत तसेच आहेत. एखाद्याचा जीव गेल्यावरच नगरपरिषदेला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून आणि विद्यार्थ्यांकडून विचारण्यात येत आहे.**



टेंभोडे येथील जिल्हा परिषद शाळेसमोरुन जाणार रस्ता हा तलावपाड्यापर्यंत जातो व पुढे तो खारेकुरण व कॉलेज रोडला मिळतो. या मार्गावरून प्रवास करणे फार जिकीरीचे झाले आहे. साधारण ७ ते ८ महिन्यांपासून रस्त्यामध्ये खड्डे पडले आहेत. आता या खड्ड्यांचा आकारही वाढला आहे. साधारण अडीच फूट लांब तसेच साधारण एक फूट खोल खड्डे झाले आहेत. यामुळे वाहन चालकांना त्याचा त्रास दररोज सहन करावा लागत आहे. पावसाळ्यामध्ये या मार्गावर त्या खड्ड्यांमध्ये दुचाकी आपटून अपघात सुद्धा झाले आहेत. अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा महत्त्वाच्या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

> **या रस्त्याच्या नवीन कामाची निविदा लवकरच काढण्यात येणार आहे. तरी या रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती लवकरात लवकर पूर्ण करू**
> **– विपुल कोरपड, बांधकाम अभियंता, पालघर नगर परिषद**

या मार्गावर यशवंतराव चाफेकर महाविद्यालय, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय व सत्ययश शाळा आहे. या इथून दररोज हजारो विद्यार्थी प्रवास करीत आहेत. तसेच, अनेक गृह संकुल सुद्धा या मार्गावर असल्याने दररोज प्रवास करणाऱ्यांची संख्या हजारोच्या घरात आहे. नगरपरिषदेने युद्धपातळीवर हे खड्डे बुजवायला हवेत. मात्र, त्यांना याबाबत काही पडलेले दिसत नाही. नगरपरिषदेने याबाबत लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

> **गेल्या अनेक महिन्यांपासून हे खड्डे पडले आहेत. याबाबत नगरपरिषदेला वेळोवेळी सूचित करण्यात आले. मात्र त्यांच्याकडून अजूनपर्यंत काहीच झालेले नाही. पुढील आठ दिवसात त्यांनी या रस्त्याची दुरुस्ती केली नाही तर आंदोलनाच्या मार्गाने आम्ही हा प्रश्न मार्गी लावू .**
> **– राहुल पाटील, सामाजिक कार्यकर्ते**

## मासेमारी नौकांवर कॅमेरे बंधनकारक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



जिल्ह्यातील प्रत्येक मासेमारी नौकेवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले आहेत. मात्र, बहुसंख्य मच्छीमारांकडून त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे मत्स्य विभागाकडून कोणती कारवाई केली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मत्स्य व्यवसाय विभाग व सागरी सुरक्षा यंत्रणेतर्फे मासेमारी नौकांची तपासणी वेळोवेळी करण्यात येते. अशा मासेमारी नौकांवर कार्यरत असलेले नौकामालक, तांडेल व खलाशी यांचे मूळ ओळखपत्र, नौकेची नोंदणी याचे प्रमाणपत्र, मूळ मासेमारी परवाना, विम्याच्या प्रती तसेच नौकेवरील तांडेल व खलाशी यांची मानकानुसार जीवनरक्षक साधने, अग्निशमन साधने नसल्याचे आढळते. अतिरिक्त तांडेल किंवा खलाशी आढळल्यास सागरी सुरक्षा यंत्रणेतर्फे अतिरिक्त तांडेल, खलाशांवर कठोर कार्यवाही करण्यात येते. सागरी सुरक्षेचा हेतू लक्षात घेता प्रत्येक मासेमारी नौकेवर सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याचे शासनाने आदेश दिले आहेत. मात्र, मासेमारी नौका मालकांकडून त्याबाबत गांभीर्याने न घेता कॅमेरे बसवण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे कॅमेरे बसवण्याचे आदेश कागदावरच राहिले आहेत.

# खैर तस्करी रोखण्यात यश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील टेन नाका येथे केलेल्या कारवाईत खैराची तस्करी करणारा ट्रक जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे तीन वाजता सापळा रचून केलेल्या कारवाईत दहा लाख रुपये किंमत असलेले खैराचे सोलीव ओंकडे जप्त करण्यात आले आहेत. कारवाईत २५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून अज्ञात ट्रक चालकाविरोधात वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दक्षता पथकाने नाशिक विभागाला खैर तस्करी बाबत दिलेल्या माहितीनुसार नाशिकमध्ये कारवाई करून दुसरा ट्रक ताब्यात घेण्यात आला आहे.

जव्हार उपवन संरक्षक कार्यालया अंतर्गत वाडा दक्षता पथकाने गुरुवारी पहाटे महामार्गावरील टेन नाका येथे सापळा रचला होता. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास खैर तस्करी प्रकरणी संशयीत एक ट्रक थांबवण्याचा प्रयत्न केला असता ट्रक चालक ट्रक रस्त्याच्या कडेला उभा करून अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. ट्रकजवळ पोहोचलेल्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी ट्रकची तपासणी केली असता ट्रकमध्ये खैराचे सोलीव ओंडके आढळून आल्याने खैराचे सोळीव ओंडके आणि ट्रक ताब्यात घेण्यात आला आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक डॉ. सैपुन शेख, विभागिय वनअधिकारी तथा दक्षता पथक प्रभारी प्रदिप पाटील यांच्या मार्गदर्शनात वनक्षेत्रपाल शरण देशपांडे आणि दक्षता पथकातील कर्मचाऱ्यांनी पार पाडली.


## पालघरमध्ये पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला

**। पालघर । प्रतिनिधी ।**

भाईंदर पश्चिमेला उड्डाणपुलाच्या शेजारी असलेल्या ठिकाणी एका पोलीस कर्मचाऱ्याला दुचाकी चालक आणि त्याच्या साथीदाराने त्या पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. वाहतूक पोलीस हवालदार गणेश ताटे हे भाईंदर पश्चिमेला उड्डाणपुलाजवळील मॅक्सेस मॉल नाका येथे वाहतूक नियंत्रणाचे काम करत होते. त्याच ठिकाणी दुचाकीवरून विना हेल्मेट जात असताना पोपटलाल जैन (६९) आणि मयंक जैन (२८) यांना अडवण्यात आले. या दोघांनी हवालदाराशी हुज्जत घालून पोलीस गणवेशावरील बक्कल नंबरची नेमप्लेट तोडून हिसकावली आणि शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण केला.

# सीगल पक्ष्यांचे कोकणात आगमन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**




दरवर्षी थंडीचा हंगाम सुरू झाला की, कोकणात समुद्रकिनाऱ्यावर विविध प्रकारच्या परदेशी पक्ष्यांचे आगमन होते. या थंडीच्या हंगामात प्रथम पांढऱ्या शुभ्र रंगांच्या बगळ्यांचे आगमन होते. हे बगळे देखील अनेकवेळा आकर्षण ठरतात. आकाशात हे बगळे विहार करत असताना मनमोहक दिसतात. यानंतर बगळ्यांच्या पाठोपाठ सीगल पक्ष्यांचे थव्याने आगमन होते. सीगल पक्षी हे दरवर्षी रत्नागिरी, दापोली, गुहागर आणि रायगड किनारपट्टीवर मोठ्या संख्येने आढळतात. यावर्षी हंगामाच्या सुरवातीलाच सिगल पक्ष्यांचे आगमन झाले आहे. कोकणातील विविध किनारे सीगल पक्ष्यांच्या आगमनांनी फुलले आहेत. दापोलीतील हर्णे, लाडघर, कर्दे, पाळदे, आडे, केळशी, गुहागर तालुक्यातील विविध समुद्रकिनारी शेकडोंच्या संख्येने सीगल पक्षी आल्याचे दिसत आहेत. त्यामुळे पर्यटकांसाठी देखील ही एक पर्वणीच ठरत आहे.

दापोली तालुक्याच्या पश्चिम किनारपट्टीवर देखील हे सीगल पक्षी अवतरले असून या पाहुण्यांनी राजापूर किनारपट्टीवर देखील मुक्काम ठोकला आहे. लडाख प्रदेशामध्ये आढळणारा सीगल पक्षी हा येथील किनारपट्टीवर आला आहे. लालभडक चोच, पांढऱ्या शुभ्र पिसांनी वेढलेले शरीर अशा आकर्षक असलेल्या या सीगल पक्ष्यांच्या थव्यांनी तालुक्याची किनारपट्टी फुलून गेली आहे. थंडीच्या कालावधीमध्ये लडाखमध्ये पडणाऱ्या बर्फामुळे या पक्ष्यांना पुरेसे खाद्य मिळत नाही. त्यामुळे खाद्य आणि वास्तव्याला अनुकूल असलेल्या परिसरात सीगल पक्षी दरवर्षी काही कालावधीसाठी स्थलांतरित होतात. या पक्ष्यांच्या हवेतील सहजसुंदर कसरती देखील पाहण्याजोग्या असून या कसरती पाहण्यासाठी अनेकांची पावले समुद्र किनाऱ्यावर वळू लागली आहेत. थंडीच्या हंगामात खास सीगल पक्षी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या देखील मोठी असते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २४ ते ३० नोव्हेंबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## आर्थिक बाजू चांगली राहील




**मेष :** मेष राशीधारकांना या सप्ताहातील ग्रहमान पाहता विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **महिलांना-** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभदिनांक-** २४,२५.

## नोकरदारांना दिलासा मिळेल



**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहात आपण आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. मात्र, सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना-** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल. **शुभदिनांक-** २६,२७.

## कोणतेही निर्णय विचारपूर्वक घ्या




**मिथुन :** मिथुनराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना-** माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **शुभदिनांक-** २८,२९.

## वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल




**कर्क :** या सप्ताहात कर्कराशीधारकास या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलांना-** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांन कडून चांगली बातमी मिळेल. **शुभदिनांक** -२४,३०.

## वरिष्ठांशी मित्रत्व राखावे



**सिंह :** सिंहराशीसाठी या सप्ताहात आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांना-** बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **शुभ दिनांक-**२६,२८.

## कलागुणांना प्रोत्साहन मिळेल



**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे, विध्यार्थीवर्गाला चांगली संधी मिळेल. **महिलांना-** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. **शुभदिनांक-**२७,२९.

## उष्णतेच्या विकारांपासून सावध रहा




**तुळ :** तुळ राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवन्याचा प्रयत्न करा. आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने आभ्यासा बाबत दुर्लक्ष करू नको. **महिलांना-** घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे, कलेत मन रमेल. **शुभदिनांक-** २९,३०.

## इतरांपेक्षा स्वतःकडे लक्ष द्या



**वृश्चिक :** वृश्चिक राशीसाठी या सप्ताहात इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील. प्रकृतीची पथ्ये पाळा. रागावर नियंत्रण ठेवा. मुलांच्या विकासाकडे लक्ष द्या. मित्रमंडळींच्या संपर्कात राहा. पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. **महिलांना-** अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभदिनांक-** २६,२९.

## उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल



**धनु :** धनु राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक खर्च करण्याचे टाळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांना बराचसा दिलासा मिळेल. आपण आपल्या चातुर्याचा उपयोग केल्यास उत्तम. व्यापार-उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल व प्रगती करता येईल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल व हाती घेतलेल्या कामात परिश्रमाने यश संपादन करता येईल. प्रकृतीची पथ्ये पाळा. मौल्यवान वस्तू सांभाळा. प्रवासात सावधानता बाळगा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. या सप्ताहात शांतता व संयम बाळगणे आवश्यक. आपल्या कार्यकौशल्याचा कस लागेल. विरोधकांवर कडक नजर ठेवा. त्यांना संधी देऊ नका. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. कुणालाही नाराज करू नका. **महिलांना-** आपल्या कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल व सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामे मार्गी लागतील. **शुभ दिनांक** - २४,२८.

## बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल



**मकर :** मकरराशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील, मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना-**कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभदिनांक** - २५, २६.

## सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळेल



**कुंभ :** कुंभराशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना-** नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक-** २७,२८.

## प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल



**मीन :** हा साप्ताहात मीनराशीसाठी एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे, मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलावर्ग-** आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या. **शुभदिनांक-** २९,३०.

# संकटांमागून संकट

**अजय तिवारी**

*अदानी यांच्यावर अमेरिकेमध्ये एका कंपनीला कंत्राट मिळवून देण्यासाठी २५० दशलक्ष डॉलर्सची लाच दिल्याचा आणि प्रकरण लपवल्याचा आरोप आहे; मात्र अदानी समूहाने हे आरोप फेटाळून लावले आहेत. फसवणुकीचे गुन्हे दाखल झाल्यानंतर अदानी समूह कंपन्यांच्या रेटिंगवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.*



जगातील पहिल्या काही श्रीमंतांमध्ये गौतम अदानी यांचा समावेश होतो. भारतामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती म्हणून त्यांची ओळख आहे. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध आहेत. भारतासोबत जगातील अनेक देशांमध्ये ऊर्जा, बंदरे, विमानतळ आदी क्षेत्रात त्यांचे उद्योग विस्तारले आहेत. अतिशय कमी काळामध्ये त्यांनी केलेली प्रगती पाहून ते अनेकांचा आदर्श बनले होते; परंतु गेल्या जानेवारीपासून त्यांचे एक एक पैलू बाहेर यायला लागले. राजकीय पक्ष, अधिकारी पैशाच्या जोरावर त्यांना हवे ते काम करून घेतात, अशी टीका सुरू झाली. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांच्यावर सातत्याने टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही राहुल यांनी अदानी आणि मुकेश अंबानी यांच्यावरून टीका केली. मोदी मूठभर उद्योजकांसाठी सत्तेचा वापर करतात, अशी राहुल यांची टीका आहे. काँग्रेसच्या अनेक नेत्यांचे अदानी यांच्यांशी चांगले संबंध आहेत. राजस्थान, छत्तीसगड आदी अनेक राज्यांमध्ये काँग्रेसचे सरकार असताना गुंतवणुकीचे करार झाले होते. असे असताना राहुल यांनी मात्र अदानी-अंबानी यांना कायम टीकेचे लक्ष्य केले. एवढेच नव्हे, तर अंबानी यांच्या मुलाच्या लग्नाला ते हजर नव्हते. अदानी यांच्यावरच्या टीकेला त्यांच्या कंपनीने कधी उत्तर दिले नाही; परंतु अदानी यांच्यावर राहुल यांनी टीका केली, तर भाजपच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे त्या पक्षाला का वाटते, हे समजत नाही. गेल्या जानेवारीपासून भारताबरोबरच अदानी यांच्यावर अमेरिका, बांगलादेश, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया या देशांमधूनही टीका होत आहे. 'हिंडेनबर्ग रिसर्च'ने जानेवारीमध्ये दिलेल्या अहवालानंतर अदानी यांच्या कंपन्यांकडे संशयाच्या भावनेने पाहिले जाऊ लागले. त्यात 'सेबी'च्या अध्यक्ष माधवी बूच यांची भूमिकाही संशयास्पद असून, भाजपने त्यांचीही पाठाराखण केली. संयुक्त संसदीय समितीने त्यांना चौकशीसाठी बोलवल्याचे दुःख भाजपला का झाले, हे अनाकलनीय आहे. राहुल गांधी यांची टीका योग्य आहे, असे नाही. काही आरोप हे राजकारणातूनही असू शकतात; परंतु असेच आरोप राजीव गांधी यांच्यावरही झाले होते. गेल्या ४० वर्षांमध्ये ते सिद्ध झाले नाही, हा भाग वेगळा. एकूणच अशी परिस्थिती असताना अदानी पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

अमेरिकेमध्ये अदानी यांनी त्यांच्या एका कंपनीला कंत्राट मिळवून देण्यासाठी २५० दशलक्ष डॉलर्सची लाच दिल्याचा आणि प्रकरण लपवल्याचा आरोप आहे; मात्र अदानी समूहाने एक निवेदन जारी करून हे आरोप फेटाळून लावले असून सर्व आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेमध्ये अशा गंभीर आरोपांना सामोरे जाणारे अदानी हे पहिले भारतीय उद्योगपती आहेत. अदानी यांच्यावर अमेरिकेमध्ये हेराफेरीचे आरोप होण्याची ही पहिलीच वेळ आहे; मात्र भारतामध्ये यापूर्वीही त्यांच्यावर असे अनेक आरोप झाले आहेत. अदानी अमेरिकेमध्ये अडकल्यानंतर त्यांच्या जागतिक महत्त्वाकांक्षेला मोठा धक्का बसू शकतो. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजयाबद्दल ट्रम्प यांचे अभिनंदन करताना, अदानी यांनी अमेरिकेच्या ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात १० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे जाहीर केले होते. अदानी यांची अमेरिकेतील गुंतवणुकीची वचनबद्धता शिल्लक राहू शकते.

त्यांच्यावरील आरोपांचे खंडन करताना अदानी समूहाने म्हटले आहे, की 'अदानी ग्रीन'च्या संचालकांवर अमेरिकेचे न्याय विभाग आणि एक्सचेंज कमिशनने केलेले आरोप निराधार आहेत. आम्ही सर्व कायद्यांचे पालन करते. अमेरिकेत आरोप निश्चित झाल्यानंतर अदानी समूहाशी संबंधित अनेक कंपन्यांचे शेअर्स २० टक्क्यांनी घसरले. रेटिंग एजन्सी 'मूडीज'च्या निवेदनानुसार, अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी आणि अमेरिकेतील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल झाल्यानंतर समूह कंपन्यांच्या रेटिंगवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. गेल्या वर्षीच अमेरिकन फॉरेन्सिक फायनान्शियल (शॉर्ट सेलिंग) कंपनी 'हिंडेनबर्ग रिसर्च'ने अदानी समूहावर अनेक गैरप्रकारांचे गंभीर आरोप केले होते. 'हिंडेनबर्ग रिसर्च'च्या आरोपानंतर अदानी समूहाच्या बाजारमूल्यात १५० अब्ज डॉलर्सहून अधिक घट झाली. अदानी यांच्यावरील आरोपांचा संबंध भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांशीही जोडला जात आहे. अदानी आणि मोदी यांच्यातील संबंधांवर विरोधक प्रश्न उपस्थित करत आहेत; मात्र अदानी आणि भाजप हे दोघेही एकमेकांचा फायदा घेण्याचे आरोप फेटाळून लावत आहेत. न्यू यॉर्कच्या 'ईस्टर्न डिस्ट्रिक्ट'च्या यूएस टर्नीच्या कार्यालयाने म्हटले आहे, की अदानी आणि त्याचा पुतण्या सागर यांच्याशिवाय इतर सहा जणांवर सौर ऊर्जा पुरवठ्याचे कंत्राट मिळवण्यासाठी भारतीय सरकारी अधिकाऱ्यांना २५० दशलक्ष डॉलर लाच दिल्याचा आरोप आहे. 'अदानी ग्रीन एनर्जी'ने आठ गीगावॅट सौरऊर्जा पुरवण्यासाठी भारताच्या 'सोलर एनर्जी कोऑपरेशन'ची निविदा जिंकली होती. त्याचप्रमाणे 'इ्युर पॉवर'चेही चार गीगावॅटची निविदा आली होती. कॅनेडियन पब्लिक पेन्शन फंड मॅनेजर जो 'इ्युर पॉवर' मध्ये गुंतवणूकदार होता त्याचेही या प्रकरणात नाव आहे. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार, 'सोलर एनर्जी को-ऑपरेशन ऑफ इंडिया' (एसईसीआय) ला अदानी आणि 'इ्युर पॉवर'ने सौर ऊर्जा विकण्यासाठी दिलेल्या किमतीत खरेदीदार शोधू शकला नाही. 'यूएस टर्नी ऑफिस'च्या म्हणण्यानुसार, २०२१ आणि २०२२ मध्ये अदानी आणि इतरांनी भारतातील अधिकाऱ्यांची अनेकदा भेट घेतली आणि वीज विक्री करारावर शिक्कामोर्तब करण्यासाठी लाच देऊ केली. लाच दिल्यानंतर ओडिशा, जम्मू-काश्मीर, तामिळनाडू आणि छत्तीसगडमधील वीज वितरण कंपन्यांनी 'एसईसीआय'शी करार केल्याचा आरोप आहे. आंध्र प्रदेशच्या अधिकाऱ्याला २२८ दशलक्ष डॉलरचे पैसे दिले गेले आणि त्या बदल्यात आंध्र प्रदेशने 'एसईसीआय' कडून सात गीगावॅट वीज खरेदी करण्याचे मान्य केले. 'अदानी ग्रीन एनर्जी'चे 'सीईओ' विनीत जैन यांच्यावर 'इ्युर पॉवर'च्या शेअरवरील कागदपत्राचा फोटो त्यांच्या फोनवरून लाच घेतल्याचा आरोप आहे. या लाचेची रक्कम आठ कोटी डॉलर होती.

अदानी समूहाबाबत अनेक देशांमध्ये वाद पाहायला मिळत आहेत. लाचेची रक्कम देण्यासाठी गौतम अदानी यांनी 'इ्युर पॉवर'च्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतल्याचा आरोप आहे. २०१७ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये 'अदानी एंटरप्रायझेस'च्या संदर्भात बराच वाद झाला होता. ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड येथील कारमाइकल कोळसा खाणीचे कंत्राट अदानी एंटरप्रायझेसला मिळणार होते. ही ऑस्ट्रेलियातील सर्वात मोठी कोळसा खाण आहे; मात्र अदानी यांना कंत्राट देण्यावरून बराच वाद झाला आणि लोक रस्त्यावर उतरले. क्वीन्सलँडमध्ये 'स्टॉप अदानी' आंदोलन ४५ दिवस चालले. ऑस्ट्रेलियामध्ये पर्यावरण नियमांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप अदानी समूहाबाबत करण्यात आला होता. जून २०२२ मध्ये श्रीलंकेच्या 'सिलोन इलेक्ट्रिसिटी बोर्डा'च्या (सीईबी) अध्यक्षांनी संसदीय समितीसमोर विधान केले होते, की मोदी यांनी शेजारील देशातील वीज प्रकल्प अदानी समूहाला देण्यासाठी अध्यक्ष गोटाबाया राजपक्षे यांच्यावर दबाव टाकला होता. . मन्नार जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाची निविदा भारताच्या अदानी समूहाला देण्यात आली होती. अध्यक्षांनी सांगितले, की मोदी यांच्या वतीने श्रीलंकेचे अध्यक्ष गोटाबाया राजपक्षे यांच्यावर हा करार अदानी समूहाला देण्यासाठी दबाव आणण्यात आला होता. या वर्षी सप्टेंबरमध्ये केनियातील नैरोबी विमानतळावर अदानी समूहाविरोधात प्रचंड विरोध झाला होता. गोटाबाया राजपक्षे यांनी त्यांना सांगितले होते, की भारत सरकारचा दबाव असल्याने ही निविदा अदानी समूहाला देण्यात आली होती. राजपक्षे यांनी मला सांगितले, की त्यांच्यावर मोदी यांचा दबाव आहे, असे फर्डिनांडो संसदीय समितीसमोर बोलताना म्हणाले होते. राजपक्षे यांनी हे आरोप फेटाळले होते. या प्रकरणावर, अदानी कंपनीच्यी प्रवक्त्याने नंतर सांगितले, की श्रीलंकेत गुंतवणूक करण्याचा आमचा हेतू शेजारील देशाच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. एक जबाबदार कंपनी म्हणून, आम्ही याला त्यांच्यातील भागीदारीचा एक महत्त्वाचा भाग मानतो. अलीकडेच बांगला देशच्या उच्च न्यायालयाने अदानी समूहाच्या वीज संबंधित सर्व करारांचे पुनरावलोकन करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली होती. २००७ मध्ये 'अदानी पॉवर'ने गोड्डा, झारखंड येथे पॉवर प्लांट बांधला होता आणि येथून बांगला देशला वीजपुरवठा करण्यासाठी करार करण्यात आला होता. बांगला देश आणि झारखंडच्या सरकारने अदानीच्या या करारावर अनेक आक्षेप घेतले होते. २०२१ मध्ये, 'अदानी पोर्टस्'ने यांगून, म्यानमार येथे कंटेनर टर्मिनल बांधण्याची योजना आखली. ही जमीन म्यानमार लष्कराकडून भाडेतत्त्वावर घेतल्याने अदानी यांची ही योजनाही छाननीत आली. म्यानमारचे लष्कर मानवी हक्कांचे उल्लंघन करत असून अदानी त्यांच्याशी करार करत असल्याची टीका आंतरराष्ट्रीय स्तरावर होत होती. सप्टेंबर २०२४ मध्ये, केनियातील नैरोबी विमानतळावरील शेकडो कामगारांनी केनिया विमानतळ प्राधिकरण आणि अदानी समूह यांच्यातील कराराला विरोध केला. अदानी समूहाला नैरोबी विमानतळ ३० वर्षांसाठी चालवण्याची जबाबदारी मिळणार होती. अदानी यांच्याकडे जबाबदारी मिळाल्यानंतर त्यांच्या नोकऱ्या गमवाव्या लागतील अशी भीती नैरोबीमधील कामगारांना होती.

अमेरिकेतील आताच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी ग्रँड ज्युरींची नियुक्ती केली जाते. हे निःपक्षपातीपणे निवडलेल्या लोकांचे पॅनेल असते. यामध्ये न्यूयॉर्क राज्यातील २३ ज्युरींचा समावेश असू शकतो. किमान १६ ज्युरी पुरावे ऐकण्यासाठी उपस्थित असतील. ग्रँड ज्युरींचा उद्देश आरोपी व्यक्तीचे निर्दोषत्व किंवा अपराध ठरवणे नाही, तर ट्रायल ज्युरीने ठरवायचे आहे, की त्या व्यक्तीवरील आरोप खरे आहेत, की नाही आणि कोणते पुरावे दिले गेले आहेत. ग्रँड ज्युरीला पुरेसे पुरावे आढळल्यास ते आरोपीवर खटला चालवण्यास सांगू शकतात. त्यानंतर हा खटला अंतिम सुनावणीसाठी आणि निर्णयासाठी नेण्यात येईल. ग्रँड ज्युरी कार्यवाहीदेखील गुप्तपणे आयोजित केली जाते, तर चाचणी कार्यवाही लोकांसाठी खुली असते. न्यू यॉर्कमध्ये कमीत कमी बारा ज्युरर्स (ज्यांनी पुरावे ऐकले आहेत १६ ते २३ पैकी) चाचणीसाठी सहमत असणे आवश्यक आहे. अदानी यांच्या प्रकरणात आरोप निश्चित केल्यानंतर खटला चालवला जाईल. न्यायाधीश आरोपांची सुनावणी घेतील आणि आरोपींना जामीन द्यायचा, की नाही याचा निर्णय घेतील. यादरम्यान, आरोपांच्या उत्तरात आरोपी दोषी किंवा निर्दोष असल्याचा दावा करतो, की नाही हे देखील पाहिले जाईल. त्यांनी दोषी ठरवले नाही, तर केस ज्युरी ट्रायलमध्ये जाईल. **

# ज्येष्ठतम कसोटीवीर : चंदू पाटणकर

**प्रवीण कारखानीस**



आजच्या घडीला आपल्या भारतात वयाने ज्येष्ठतम असलेले कसोटी क्रिकेटपटू म्हणून मुंबई - निवासी डॉ. चंद्रकांत त्रिंबक पाटणकर अर्थात चंदू पाटणकर यांचेच नाव डोळ्यां समोर येते ! रविवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी ते आपल्या वयाची ९४ वर्षे पूर्ण करून ९५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यांचे मनापासून अभीष्टचिंतन करण्याच्या उद्देशाने मी आणि माझा मित्र किशोर देसाई असे आम्हा दोघांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली.

चंदू पाटणकर हे १९५५ साली भारताचे यष्टिरक्षक म्हणून कलकत्त्याच्या ईडन गार्डन स्टेडियमवर न्यूझीलंड विरुद्धचा चौथा कसोटी सामना खेळले होते, त्या वेळी त्यांनी न्यूझीलंडच्या गॉर्डन लेगाट आणि बर्ट सटक्लिफ् या दोन्ही सलामीच्या फलंदाजांचे झेल यष्टीमागे लीलया पकडून त्यांना बाद केले होते तसेच टोनी मॅकगिबन् या मातब्बर फलंदाजाला यष्टिचीत केले होते. त्याच सामन्यात ते जेव्हा भारतातर्फे आठव्या क्रमांकावर फलंदाजी करायला मैदानात उतरले होते तेव्हा भारताची धावसंख्या ७ बाद ८८ इतकी शोचनीय होती. अश्याही परिस्थितीत चंदू पाटणकर यांनी जे एम घोरपडे यांना उत्तम साथ देत अर्धशतकाची भागीदारी केली आणि स्वतः १३ धावा काढल्या. दुसऱ्या डावात फलंदाजी करत असताना त्यांनी अवघी एकच धाव काढलेली असताना भारताने डाव घोषित केल्याने ते नाबाद राहिले. दुसऱ्या डावात यष्टिरक्षक म्हणून खेळत असताना त्यांनी न्यूझीलंडचा फलंदाज जॅक अलबस्टर याचा यष्टीमागे झेल घेतला. एकंदरीत पाहता त्यांची कामगिरी समाधानकारकच झाली होती मात्र तरीही चंदू पाटणकर यांच्या नावाचा विचार कसोटी सामन्यांसाठी पुढे कधी केला गेलाच नाही. नरेन ताह्मणे आणि नाना जोशी यांनाच भारताचे यष्टिरक्षक म्हणून पुढे अनेक वर्षे संधी मिळत गेली आणि चंदू पाटणकर यांची कसोटी कारकीर्द, कलकत्त्यातल्या त्या एकमेव कसोटी सामन्यानंतर समाप्तच झाली. प्रथम दर्जाच्या २६ सामन्यात त्यांनी ३८ फलंदाजाना यष्टीमागे क्षेत्ररक्षण करताना बाद केले होते आणि स्वतः फलंदाजी करत असताना पाचशेहून अधिक धावा रचल्या होत्या.

अश्या या क्रिकेटवीरांच्या घरी, चविष्ट कांदेपोहे आणि फक्कड चहाचा पाहुणचार घेत आम्ही त्यांच्याशी मनमुराद गप्पांचा आनंद लुटला. चंदू पाटणकर यांना पायाच्या दुखण्यामुळे काठीचा आधार घेतल्याशिवाय घरात चालणे देखील फार शक्य होत नाही. व्हील चेअरचा वापर करणे त्यांना सुरक्षितपणाचे आणि सोयीचे वाटते. त्यांची देहयष्टी सुदृढ आहे, कांती सतेज आहे, दृष्टी आणि स्मृती याही वयात उत्तम आहे. त्यामुळे ते आजही दूरदर्शनवर क्रिकेटचे सामने पाहत असतात. क्रिकेटविषयक मराठी - इंग्रजी पुस्तके वाचत असतात. मी स्वतः २००४ साली भारत - पाकिस्तान एकदिवसीय क्रिकेट सामने पाहण्याच्या निमित्ताने पाकिस्तानला गेलो असताना आलेल्या अनुभवांचे वर्णन ज्या माझ्या पुस्तकात लिहिले आहे ते माझे पुस्तक त्यांनी एकदा नव्हे तर दोनदा वाचले असल्याचे त्यांनी मला सांगताच माझ्या अंगावर मूठभर मांस चढले. क्रिकेटपटू संदीप पाटील याने स्वतः त्यांना भेट दिलेल्या " बियॉण्ड द बाउंडरीज्" या त्याच्या नव्या कोऱ्या आत्मचरित्राची प्रत त्यांनी मोठ्या आत्मीयए तेने आम्हा दोघांना दाखवली. माझे नवे पुस्तक "दिसामाजी काहीतरी.." मी त्यांना भेट देताच त्यांनी मला त्या पुस्तकावर स्वाक्षरी करण्यासाठी त्यांचे एक विशेष आवडते पेन दिले जे सुनील गावस्कर यांनी त्यांना सप्रेम भेट दिले होते. गप्पांच्या ओघात भारताच्या पहिल्या पाकिस्तान दौऱ्याचा विषय निघाला. हा दौरा डिसेंबर १९५४ ते मार्च १९५५ या दरम्यानचा होता. त्या दौऱ्यासाठी यष्टिरक्षक म्हणून भारतीय संघात आपली निवड होईल असा बहुधा त्यांचा कयास होता परंतु भारताच्या संघात यष्टिरक्षक म्हणून नरेन्द्र ताम्हणे यांची प्रथमच निवड झाली. अशयाप्रकारे आपली ती संधी हुकली याची सल, चंदू पाटणकर यांना आजही वाटत असल्यास नवल वाटायला नको मात्र नरेन्द्र ताम्हणे यांच्याबद्दल त्यांच्या मनात तिळमात्र असूया किंवा मत्सर नाही उलट अमाप जिव्हाळाच आहे, हेही त्यांच्या बोलण्यातून मला स्पष्टपणे जाणवले. पाकिस्तानच्या त्या दौऱ्यात लाहोर, पेशावर किंवा बहावलपुर यांपैकी कुठल्यातरी एका शहरात भारतीय संघाच्या सगळ्या खेळाडूंना एकाच ठिकाणी एकत्रितपणे राहणे शक्य होईल असे एकही दर्जेदार हॉटेल नसल्याने त्यांची राहण्याची सोय चक्क तिथल्या रेल्वेस्थानकातल्या लोहमार्गावर रेल्वेचे दोन खास डबे एकाच जागी उभे करून त्यामध्ये करण्यात आली होती, असेही आम्हाला चंदू पाटणकर यांच्याकडूनच समजले आणि त्या गोष्टीची खूप गंमत वाटली. त्याकाळी पाच दिवसांच्या कसोटी सामन्यात संघातल्या प्रत्येक खेळाडूला प्रतिदिनी रुपये पन्नास या दराने पैसे दिले जात असत. सामना चारच दिवसांत संपला तर पाचव्या दिवसाचे पैसे मिळत नसत. असा तो जमाना असल्याचे ते म्हणाले. १९५५ साली ते स्वतः जो एकमेव एक कसोटी सामना खेळले होते, तेव्हा पॉली उम्रीगर हे त्या संघाचे कर्णधार होते. विनू मंकड आणि नरी कॉन्ट्रॅक्टर हे सलामीचे फलंदाज होते. पंकज रॉय तिसऱ्या क्रमांकाचे फलंदाज होते. विजय मांजरेकर, पॉली उम्रीगर, गुलाबराय रामचंद आणि जयसिंगराव घोरपडे हे मधल्या फळीचे फलंदाज होते तर दत्तू फडकर आणि जी. सुंदरम् हे द्रुतगती गोलंदाज म्हणून आणि सुभाष गुप्ते हे फिरकी गोलंदाजीचे जादूगार म्हणून या संघात होते. अशा संघात यष्टिरक्षक म्हणून खेळण्याची संधी, चंदू पाटणकर यांना मिळाली होती. असो. चंदू पाटणकर यांचा जन्म तत्कालीन कुलाबा जिल्ह्यातल्या (आजच्या रायगड जिल्ह्यातल्या) पेण या गावी २४ नोव्हेंबर १९३० रोजी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील एम्. बी. बी. एस. पदवीप्राप्त डॉक्टर होते. केवळ वैद्यकीय व्यवसायासाठी ते आपला कुटुंबकबिला घेऊन पुण्याला आले. त्यांनी डेक्कन जिमखान्यालगतच्या पी. वाय. सी. हिंदू जिमखान्यासमोरच एक घर घेतले आणि तिथेच आपला दवाखाना सुरू केला. साहजिकच त्याच भागात राहत असलेले क्रिकेट महर्षी प्रा. दि. ब. देवधर यांचे त्या दवाखान्यात अधूनमधून येणे-जाणे होऊ लागले आणि चंदू पाटणकर यांचे वडील हे प्रा. देवधर यांचे मित्र आणि फॅमिली डॉक्टर झाले. प्रा. देवधर हे एस्. पी. कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. कॉलेज संपल्यावर संध्याकाळच्या वेळी ते धोतर नेसून मात्र पायांना पॅड बांधून जिमखान्याच्या मैदानावर क्रिकेटचा सराव करत असत. त्यामुळे चंदू पाटणकर यांना त्यांच्या बालपणीच प्रा. देवधर यांची फलंदाजी अगदी सहजपणे आणि जवळून बघता आली. पुण्यातल्या सुप्रसिद्ध मॉडर्न हायस्कूलमध्ये शिकत असताना ते शाळेच्या क्रिकेट संघाचे कॅप्टन होते. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुण्यातल्याच फर्ग्युसन कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला मात्र वर्षभरानंतर ते मुंबईला आपल्या थोरल्या बहिणीकडे हिंदू कॉलनीत राहायला आले. त्याच इमारतीत क्रिकेटपटू माधव मंत्री राहत होते. चंदू पाटणकर यांची बहीण रुईया कॉलेजमध्ये वनस्पती शास्त्राची प्राध्यापिका होती आणि मेव्हणे त्याच रुईया कॉलेजमध्ये पदार्थविज्ञान विषयाचे प्राध्यापक होते. केवळ याच कारणास्तव चंदू पाटणकर यांनी रुईया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. याच कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांना कॉलेजच्या क्रिकेट संघातून खेळायची संधी मिळत गेली. यष्टिरक्षण करण्यात ते कुशल असल्याचे वारंवार सिद्ध झाल्याने पुढे प्राणिशास्त्रात, झूलॉजीमध्ये एम्. एस्सी. करत असताना त्यांना मुंबई विद्यापीठाच्या संघात यष्टिरक्षक म्हणून घेण्यात आले. इंटर- युनिव्हर्सिटी सामन्यांमधली त्यांची कामगिरी पाहून त्यांना मुंबईतर्फे रणजी सामन्यात खेळायची संधी आपोआपच मिळाली. १९५३ पासूनच्या पुढील दहा वर्षात ते दहा रणजी सामने खेळले. त्यातले अखेरचे एक - दोन सामने ते केवळ त्यांचे मित्र चंदू बोर्डे यांच्या आग्रहास्तव, महाराष्ट्र संघाकडून खेळले. चंदू बोर्डे हे त्या काळी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करत असत.

चंदू पाटणकर यांनी १९५४ साली आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होताच मुंबईतल्या बी. ई. एस.टी. मध्ये तिकीट तपासनीसाची नोकरी स्वीकारली आणि पुढे १३ वर्षे ती इमाने इतबारे केली. त्यादरम्यान ते 'टाईम्स शील्ड' साठीचे सामने खेळले. प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि यशस्वी उद्योजक माधव आपटे यांनी सोलापूर येथील लक्ष्मी विष्णु कॉटन मिल विकत घेतल्यानंतर चंदू पाटणकर यांना १९७० साली त्याच मिलमध्ये जनसंपर्क अधिकारी या पदावरची चांगल्या पगाराची नोकरी दिली. सुमारे सोळा वर्षे ही नोकरी करत असताना चंदू पाटणकर यांनी सामग्री व्यवस्थापनशास्त्र (मटेरियल्स मॅनेजमेंट ) या विषयाचा सखोल अभ्यास केला आणि पुढे त्याच विषयात लेखन- संशोधन करून १९८५ साली पुणे विद्यापीठाची पी. एच. डी. अर्थात 'डॉक्टरेट' मिळवली. विशेष म्हणजे एम. एस्सी. केल्यानंतर तब्बल तीस वर्षांनी त्यांनी डॉक्टरेट ही उपाधी प्राप्त केली. ही उपाधी प्राप्त केलेले तेच एकमेव भारतीय कसोटीवीर आहेत. क्रिकेट क्लब ऑफ इंडियाचे तत्कालीन अध्यक्ष राज सिंह डुंगरपूर यांनी सी,सी. आय. च्या सचिवपदी त्यांची नियुक्ती केली त्यामुळे ते उर्वरित काळात क्रिकेट या खेळाशी आणि क्रिकेट खेळाडूंशी कायम निगडित राहिले त्याशिवाय सेवानिवृत्तीनंतर तहहयात मिळणाऱ्या निवृत्तीवेतनासाठी देखील ते पात्र ठरले. आज त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना मिळत असलेले घसघशीत रकमेचे निवृत्तीवेतन त्यांच्यासाठी जणू वरदानच ठरले आहे. बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया यांनी एके वर्षी त्यांच्यासाठी "बेनेफिट मॅच" घ्यायचे ठरवून त्यांना दहा लाख रुपयांची थैली देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते, परंतु नेमके त्याच सुमारास दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार हॅन्सी क्रोनिए याचे मॅच फिक्सिंग उघडकीस आले आणि क्रिकेट विश्वाला जबरदस्त हादरा बसला. परिणामतः चंदू पाटणकर यांच्यासाठी आयोजित केलेला मदत - सामना रद्द करण्यात आला. त्याऐवजी बी.सी. सी. आय ने चंदू पाटणकर यांना आधी ठरवलेल्या रक्कमेच्या दामदुप्पट रक्कम देऊन त्यांचा सन्मान केला. या गोष्टीचा उल्लेख करताना चंदू पाटणकर यांनी बी. सी. सी. आय. बद्दल त्यांना वाटत असलेली कृतज्ञतेची भावना आम्हाला स्पष्ट शब्दांतच बोलून दाखवली.

चंदू पाटणकर यांच्या धर्मपत्नी सौ. शकुंतला या मूळच्या साताऱ्याच्या विष्णुपंत कारखानीस यांच्या सुकन्या होत्या. आपल्या माहेरच्या उच्चशिक्षित आणि उच्चभ्रू कुटुंबाचे आपल्यावर झालेले संस्कार त्यांनी चंदू पाटणकर यांच्यासोबत संसार करत असताना निगुतीने जपले होते. १९९३ साली त्यांचे निधन झाले. तेव्हापासून गेली तीस वर्षे चंदू पाटणकर हे एकाकी जीवन जगत असले तरी त्यांच्या जुळ्या मुली, वैजयंती आणि जयवंती या विवाहोत्तर मुंबईतच स्थायिक झालेल्या असल्याने चंदू पाटणकर यांना त्यांचा मोठा आधार वाटतो. आज भारतीय कसोटीवीरांमध्ये वयाने ज्येष्ठतम असलेले डॉ. चंद्रकान्त त्रिंबक पाटणकर अर्थात चंदू पाटणकर यांच्यासोबत मनमोकळ्या गप्पा मारण्याचे भाग्य आम्हा दोघांना लाभले याचा नक्कीच आनंद वाटतो. **

# एक सल

**सायराबानू चौगुले**

एकविसाव्या शतकात देशांमध्ये, राज्यामध्ये विजेची कमतरता भासू लागली त्यामुळे लोडशेडीग, अक्षय प्रकाश योजना सुरू झाली. विजेचा काटकसरीने वापर सुरू झाला. ठराविक तास गावेच्या गावे, शहरेच्या शहरे अंधारात राहण्याची वेळ आली. दिलेल्या वेळेत घरामध्ये एक बल्ब लावणे, टीव्ही न लावणे, पंखे न लावणे हे नियम घालून देण्यात आले. या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी गावागावातून, शहराशहरातून पथके फिरू लागली. कालांतराने वीज टंचाई दूर झाली पण ज्या शेतीच्या, शेतकऱ्यांच्या जीवावर आपण जगतो त्या शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक असणारे विजेचे लोडशेडिंग आजही सुरूच आहे. आठवड्यातून तीन दिवस दिवसा तर तीन चार दिवस रात्री लाईट असते. ज्या शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेल्या अन्नावर आपण जगतो त्या माझ्या शेतकरी बापाला शेतीला पाणी पाजण्यासाठी रात्रीच्या अंधारात काटे, विंचू ,साप यांची तमा न बाळगता रात्री येणाऱ्या लाईट वर शेती जगवण्यासाठी शेतीला पाणी पाजण्यासाठी रात्रभर जागत शेतात फिरावे लागते तर दुसरीकडे शहरांमध्ये विजेचा नुसता पूर वाहात आहे जणू असे वाटते. असे वाटते रात्र झालेलीच नाही. मोठमोठ्या मॉलमध्ये तर दिवस-रात्र झगमगाट चालू असतो. मोठमोठे कारखाने विजेवर रात्रंदिवस चालू असतात. मोठ-मोठे हॉटेल, धाबे यावर तर आतमध्ये दिवे असतातच इमारतीलाही लाईटच्या माळांनी नव्या नवरीसारखे नटविलेले असते. आत बाहेर वीज वापरून शिल्लक राहिलेली असते म्हणून की काय हॉटेल व धाब्यासमोरील झाडावरही लाईटीच्या माळेचे वेटोळी काय घालतात फांद्यावर माळा काय सोडतात मग माझ्या शेतकरी बापाच्या नशीबीच अंधार का? रात्र रात्र जागणे का ?

माझ्या शेतकरी बापानेच का जपून वीज वापरायची? त्याच्या जीवाची पर्वा कोणालाच नाही. त्याच्या जीवावर असणाऱ्या त्याच्या कुटुंबाची चिंता कुणालाच नाही त्याला वाली कोणीच नाही का ? त्याच्या नशीबीच हे वीजनियमन का ? दोन दशके उलटून गेली तरी माझ्या शेतकरी बापाला दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सात दिवस, महिन्याचे तीस दिवस, वर्षाचे बारा महिने का नाही वीज पुरवू शकत. या अन्यायाविरुद्ध, या मुस्कटदाबीविरुद्ध माझा शेतकरी बाप का नाही आवाज उठवत? कारण माझा बाप शेतीच्या बाहेर जग पाहतच नाही. कोण काय करतोय, कुणामुळे व का माझ्यावर अन्याय होतोय याचीच मुळात त्याला जाणीव नाही. शेतकरी भक्कमपणे संघटित नाही. शेतकऱ्याला स्वतःचा असा आत्मविश्वासू चेहरा नाही. त्याला असेल त्या परिस्थितीत जीवन कंठण्याची सवय झाली आहे. असेल तसे राहणे हा साधेपणा त्याने झुगारून द्यायला हवा. आजूबाजूला काय घडते आहे. माझ्या बाबतीत काय घडत आहे. याची तुलना करून माझ्यावर कोणत्या प्रकारचा अन्याय होत आहे. त्याविरुद्ध मी कसे बंड करायला हवे , कोणत्या गोष्टीसाठी पेटून उठायला हवे? कोणाकडे दाद मागायला हवी? याची जाणीव व्हायला हवी. यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावायला हव्यात. जपानी शेतकऱ्याप्रमाणे स्वतःचे विचार आधुनिक करून आधुनिक शेतीकडे वळायला हवे.

विजेचा कसा बेदरकारपणे उपयोग केला जातो यासाठी मी अनुभवलेले एक उदाहरण देईन आजकाल लोकांच्या सोयीसाठी निघालेले मल्टीपर्पज हॉलमध्ये गेला तर सगळीकडे दिवेच्या दिवे दिवसाही जळताना दिसतात. त्यालाच लागून दुसरा छोटा हॉल असेल आणि तिथे काही काम किंवा मीटिंग नसेल तरी तिथे काम करणारे कामगार सर्वच लाईटस् लावून ठेवतात.

अगदी लॉन, पॅसेज, वॉशरूम या ठिकाणी दिवसा गरज नसतानाही लाईट्स जळत असतात. म्हणजे विज वाया घालवू नये हे त्यांच्या गावीही नसते. त्याच्याही पुढे जाऊन कार्यक्रम आटोपून निघालेल्या लोकांनाही वीज बंद करावी, ती वाया जात आहे याच्याशी त्यांचे काही घेणेदेणेही नसते नव्हे ते आपले कर्तव्यच नाही असे समजतात.

मी तर जिथे गरज नाही तिथे लाईट जळत असतील तर जाणीवपूर्वक स्वतः बंद करते. कारण तेव्हा मला माझ्या डोळ्यासमोर अंधारात चाचपडत एवढ्याशा बॅटरीच्या उजेडात शेतात वाट शोधणारा शेतकरी बाप माझ्या डोळ्यासमोर येत असतो.

टीप - माझी शेती वाटेकरी करत असला तरी माझा अन्नदाता मला माझा बापच वाटतो. **

# स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लुप्त्या व युक्त्या





आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५



त्रिकोण हा शब्द जुन्या लॅटीन शब्द''ट्रायंगुलमं'' वरून आला आहे. ज्याचा अर्थ तीन कोणाचा आहे. त्रिकोण हा मुलभूत आकार आहे. जे आपण आपल्या दैंनदिन जीवनात अनेक ठिकाणी पाहतो. त्रिकोण हा एक साधा बंद वक्र किंवा बहुभूज आहे. जो तीन रेषाखंडांनी तयार केला आहे. भूमिती मध्ये कोणतेही तीन बिंदू विशेषतः समरेखा नसलेले एक अद्वितीय त्रिकोण बनवतात आणि स्वतंत्रपणे एक अद्वितीय समतल (द्वि-आयामी ''युक्लिडीयन स्पेस'' म्हणून ओळखले जाते.) त्रिकोणाचे मूळ घटक म्हणजे बाजू कोण आणि शिरोबिंदू.

**त्रिकोण आणि त्रिकोणाचे गुणधर्म**

त्रिकोण ही एक समतल आकृती आहे. आणि त्याचा आतील भाग एक समतल प्रदेश आहे. त्रिकोणाच्या शिरोबिंदूला शिखर म्हणतात. पाया आणि शिखर मधील सर्वात लहान विभाग म्हणजे उंची. एका सरळ रेषेत नसलेले तीन बिंदू सरळ रेषांनी जोडून तयार झालेल्या आकृतीला त्रिकोण म्हणतात. या रेषांना त्रिकोणाच्या बाजू म्हणतात. त्रिकोणाच्या आकृतीतील सर्वात खालच्या बाजूला त्रिकोणाचा पाया म्हणतात. सर्वात वरच्या कोन बिंदूला शिरोबिंदू म्हणतात. शिरोबिंदूपासून पायावर टाकलेल्या लंबरेषेच्या शिरोबिंदू ते पाया या लांबीला त्रिकोणाची उंची म्हणतात. त्रिकोणाच्या अंतर्गत तिन्ही कोनांची बेरीज १८०० अंश असते. त्यामुळे कोणतेही दोन कोनमाहित असल्यास तिसरा कोन सहज काढता येतो. त्रिकोणाच्या सर्वात मोठ्या बाजूसमोरील कोन सर्वात मोठा असतो. त्रिकोणाचा पाया व उंची माहित असल्यास त्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ काढ़ता येते.




महत्वाच्या व्याख्या व नियम

१) शिरोलंब- त्रिकोणाच्या शिरोबिंदूतून त्याच्या समोरील बाजूवर काढलेला लंब.

२) लंब संपात बिंदू - शिरोलंबाचा संपात बिंदू

३) त्रिकोण लंबसंपात बिंदूचे स्थान

A. **लघुकोन त्रिकोण ............ त्रिकोणाच्या अंतर्भागात**

B. **काटकोन त्रिकोण ............. काटकोन करणाऱ्या कोनाचा शिरोबिंदूवर**

C. **विशालकोन त्रिकोण .............. त्रिकोणाच्या बाह्य भागात**

४) लंबदुभाजक - त्रिकोणाच्या बाजूंच्या मध्यबिंदूवरील लंबरेषा

५) परीवर्तुळ - त्रिकोणाच्या तिन्ही शिरोबिंदूतून जाणारे वर्तुळ

६) परीकेंद्र- परीवर्तुळाचा केंद्र त्रिकोणाच्या लंबदुभाजकाचा संपात बिंदू हा त्याच्या परीवर्तुळाचा केंद्र असतो.

७) कोणत्याही काटकोन त्रिकोणाच्या कर्णाचा मध्यबिंदू हा परीकेंद्र असतो.

परीकेंद्र हा त्रिकोणाच्या शिरोबिंदू पासून समान अंतरावर असतो. परीकेंद्र काढण्यास २ बाजूंच्या लंब दुभाजकांचा छेदन बिंदू काढणे पुरेसे असते.

८) अर्धवर्तुळ - त्रिकोणाच्या तिन्ही बाजूंना स्पर्श करणारे वर्तुळ कोन दुभाजकांचा संपात बिंदू हा त्यांचा अंतवर्तुळ केंद्र असतो.

९) मध्यगा- त्रिकोणाचा शिरोबिंदू व त्याच्या समोरील बाजूचा मध्यबिंदू यांना जोडणारा रेषाखंड मध्यगाच्या संपात बिंदूमुळे प्रत्येक मध्यगेचे २:१ या प्रमाणात विभाजन होते.

१०) गुरुत्वमध्य - मध्यमांच्या संपातबिंदुला गुरुत्वमध्य म्हणतात.

११) समभूज त्रिकोणाच्या मध्यगा कोन दुभाजक व शिरोलंब हे एकरूप असतात.

महत्वाची सूत्रे

१)त्रिकोणाचे क्षेत्रफळ= ½X पाया Xउंची

२) काटकोन त्रिकोणाचे क्षेत्रफळ = काटकोन करणाऱ्या बाजूंचा गुणाकार / २

३) त्रिकोणाची परिमिती = तीन बाजूंची बेरीज

४) समभूज त्रिकोणाचे क्षेत्रफळ = √३/४X (बाजू)२

५) त्रिकोणाची अर्धपरिमिती= तीन बाजूंची बेरीज/२

६) त्रिकोणाच्या कोनांच्या मापांची बेरीज १८०० अंश असते.

त्रिकोणाचे कोनावरून पडणारे प्रकार तीन आहेत ते खालीलप्रमाणे.

१) ज्या त्रिकोणाचे तिन्ही कोन ९०० पेक्षा कमी मापाचे असतात त्या त्रिकोणास लघुकोन त्रिकोण म्हणतात.

२) ज्या त्रिकोणाचा एक कोन काटकोन ९०० मापाचा आणि दोन कोन ९०० अंशापेक्षा कमी मापाचे (लघुकोन) असतात त्या त्रिकोणाला काटकोन त्रिकोण म्हणतात.

३) ज्या त्रिकोणाचा एक कोन ९०० पेक्षा जास्त मापाचा असतो व इतर दोन कोन ९०० पेक्षा कमी मापाचे (लघुकोन) असतात त्या त्रिकोणाला विशाल कोन त्रिकोण म्हणतात.

त्रिकोणाचे बाजूवरुन पडणारे प्रकार तीन आहेत ते

१) समभूज त्रिकोण- ज्या त्रिकोणाच्या तिन्ही बाजू भुजा समान मापाच्या (एकरूप) असतात त्या त्रिकोणाला समभूज त्रिकोण असे म्हणतात.

२) समद्विभूज त्रिकोण- ज्या त्रिकोणाच्या दोन बाजू समान मापाच्या (एकरूप) व एक बाजू वेगळ्या मापाची असते त्यास समद्विभूज त्रिकोण असे म्हणतात.


३) विषमभूज त्रिकोण - ज्या त्रिकोणाच्या कोणत्याही दोन बाजू एकरूप नसतात त्या त्रिकोणास विषमभूज त्रिकोण असे म्हणतात.

हे ही लक्षात ठेवा.

१) त्रिकोणाची एकास एक संगती आपल्याला सहा प्रकारे लिहिता येते.

२) प्रत्येक एकास एक संगतीवरून बाजू व कोनाच्या जोड्या लिहिता येतात.

३) त्रिकोणाचे कोन दुभाजक- त्रिकोणाच्या कोनांचे दोन एकरूप भागात विभाजन करणाऱ्या किरणास त्या कोणाचा दुभाजक म्हणतात. बाजूच्या आकृतीत किरण AL हा AC चा कोन दुभाजक आहे.




४) त्रिकोण एकरूपतेच्या कसोट्या

दोन त्रिकोण एकरूप असण्यासाठी तीन संगत बाजूंच्या जोड्या व तीन संगत कोनाच्या जोड्या असेसहा घटक एकरूप आहेत हे माहित असण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी फक्त काही विशिष्ट तीन संगत घटक एकरूप आहेत एवढेच माहित असले तरी ते दोन त्रिकोण एकरूप होतात.

# नितांत वाचनीय जीवनानुभव

## उरूस




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

''उरूस'' हा डॉ.विजया फडणीस यांचा ललित लेख संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. सन १९९९ ते २०२१ या काळात विविध नियतकालिकांत वेळोवेळी प्रकाशित झालेल्या लेखांचे हे संकलन आहे. विवाह होईपर्यंत लेखिकेचे वास्तव्य नागपूरला होते.

लग्नानंतरची आठ-नऊ वर्षे अहमदाबाद आणि नंतर १९८६ ते १९९२ या काळात मांजरी येथे आणि आता त्या हडपसरला वास्तव्याला आहेत. गेल्या तीस वर्षांत वरील सर्व ठिकाणांमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत, माणसेही बदलली. श्रीराम पाटील यांचे काहीसे अमूर्त वाटणारे, रंगीत मुखपृष्ठ वाचकाला आकर्षित करते. या पुस्तकात एकूण सदतीस लेख आहेत.

विजया फडणीस या पूर्वाश्रमीच्या विजया देशपांडे. नागपूरच्या वास्तव्यामुळे वऱ्हाडीपण रक्तात भिनले होते. पेशाने म ानसशास्त्रज्ञ. लग्न झाले त्यावेळी त्यांचे पीएच.डी. चे काम सुरू होते. सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै.डॉ.य.खु.देशपांडे हे त्यांचे आजोबा.

अहमदाबाद येथील विविध अनुभव त्यांच्या विविध लेखांतून व्यक्त होतात. सुरुवातीलाच ''त्रिस्थळी यात्रा'' या दोन भागांच्या लेखात, त्यांनी आपली कौटुंबिक पार्श्वभूमी, विविधांगी वाचन आणि साहित्याची आवड आणि त्यामधील अनुभव, याविषयी लिहिले आहे. सत्याचे प्रयोग, या लेखात लेखिकेने १९७२-७३ मधील,

कॉलेजमधील इंग्रजी शिकविणाऱ्या प्राध्यापकांविषयी लिहले आहे. आवश्यक इंग्रजी विषयाकरिता, महात्मा गांधींची आत्मकथा, हे इंग्रजी भाषेतील पाठ्यपुस्तक नेमले होते. हा विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांना महात्मा गांधींविषयी तीव्र तिटकारा होता. त्यांनी शिकविण्याचा ''उपचार'' कसातरी पूर्ण केला. परंतु विजयाबाईंना महात्मा गांधींची खरी ओळख गुजरातच्या वास्तव्यात झाली. तेथे त्या प्रयत्नपूर्वक गुजराती भाषा शिकल्या आणि त्यांनी महात्मा गांधींच्या मूळ आत्मकथेचा आणि तेथील अन्य साहित्यिकांच्या साहित्याचा आस्वाद घेतला. त्यामुळे त्यांना महात्मा गांधींचे मोठेपण समजले. हे त्यांनी सविस्तरपणे लिहिले आहे. गुर्जर संस्कृती आणि गुजरातशी संबंधित अन्य लेख नितांत वाचनीय झाले आहेत.

तळ्यात मळ्यात, या लेखात विजया यांनी मांजरी येथील अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. तेथील डेक्कन शुगर इन्स्टिट्यूटमध्ये त्यांचे पती नोकरीला होते. तेथील पाच-सहा वर्षांतील, विविध अनुभव त्यांनी अन्य लेखांतूनही मांडले आहेत. या मुक्कामात यांचे वाचन आणि लेखन बहरले. हे सर्वच लेख नितांत वाचनीय झाले आहेत. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास त्यांनी पीएचडीच्या निमित्ताने केला होता. नोकरीची दुनिया, या लेखात त्यांनी त्या निमित्ताने विविध नोकरदार वर्गातील स्त्रीपुरुषांविषयीचे त्यांचे अनुभव वाचनीय आणि थक्क करणारे आहेत. ''गरवारे महाविद्यालय'' या लेखात, त्यांनी आपल्या जीवनातील प्राध्यापक म्हणून आलेले अल्पकालीन अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. ते प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्वांनाच प्रेरक वाटतील. नाच रे मोरा, साडीवाला, ताजमहल, उरूस, आकु आला, आकु आला, घरची बाग, मच्छरदाणी, पाहुणे हे सर्व उत्तम, वाचनीय, विनोदी लेख झाले आहेत. मला काय येतं?, विचारामागचा विचार, दोन सद्गुणांची गोष्ट, या पुस्तकांचे करायचे तरी काय?, घराणेशाही हे लेख नितान्त वाचनीय आणि विचारप्रवर्तक झाले आहेत.

सुरुवातीच्या लेखन काळात लेखिकेचे प्रसिद्धीसाठी दिलेले लेखन, खूप वाट पाहिल्यावर ''साभार परत'' येत असे. आता ही प्रथाही बंद झाली असावी. परंतु नंतरच्या काळात, त्यांचे प्रकाशित लेख वाचून अनेक खुशीपत्रे आली. त्यासंबंधीचा ''साभार परत ते खुशी पत्रे'' हा शेवटचा लेख वाचनीय आणि लेखन करणाऱ्यांना प्रोत्साहन देणारा झाला आहे.

''उरूस''मधील विविध लेखांतून डॉ.विजया फडणीस यांचे विविध जीवनानुभव व्यक्त होतात. अनेक थोरामोठ्यांचा त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहवास लाभला होता. या विविध लेखांतून त्यांचा अभ्यासूपणा, विनोदी लेखन करण्याची क्षमता आणि विविध माणसे 'वाचण्याची क्षमता' उत्तम प्रकारे स्पष्ट होते. त्यामुळेच हे पुस्तक नितांत वाचनीय आणि संग्राह्य झाले आहे.

**पुस्तकाचे नाव : उरूस**
**लेखिका : डॉ. विजया फडणीस**
**भ्रमणध्वनी : ९८२२५५९८३७**
**प्रथमावृत्ती : १३ ऑगस्ट २०२४**
**पृष्ठे : १९८ मूल्य : रुपये २५०/-**

# कैकयीची व्यक्तीरेखा... नायिका की खलनायिका?



धनंजय शेटये

'कैकेयी' ही रामायणातील व्यक्तिरेखा खलनायकी छटा घेऊन वावरत होती. पण खरंतर ती व्यक्तिरेखा दासी मंथरेच्या विचाराने तशी वागली होती. पुत्रप्रेम आणि पुत्राचे भवितव्य यात प्रत्येक आईची आत्मियता असते. त्यात आपल्या दोन सवतींचा त्यांच्या मुलांचा हक्क आणि हिस्सा! त्यात ती मुळात राजकन्या होती. त्यामुळे कदाचित तत्कालीन परिस्थितीत तिचे वागणे नीतीबाह्य होते असेलही! पण तिची स्वतंत्र अशी कहाणी आहे. ती सौंदर्यवान होती, शूर होती. पितृभक्त होती. पण तिने पुत्रप्रेमाच्या हव्यासापोटी गृहकलह निर्माण केला. प्रभू रामचंद्रावर नितांत प्रेम होतं. पण सख्खा मुलगा आणि सावत्र मुलगा या पेचप्रसंगात मानसिक गुंतागुंत तिला खलप्रवृत्तीकडे घेऊन गेली. राजा दशरथाच्या रथाचे रुतलेले चाक तिने एकटीने उचलून बाहेर काढले होते, तीने सारथी बनून दशरथ राजाला साथ दिली होती. मानवाचा स्वार्थी गुण काही केल्या बदलत नाही.

अयोध्येचा राजा दशरथ याच्या तीन पत्नींपैकी दुसरी पत्नी व अयोध्येची राणी होती. ती केकय देशाच्या अश्वपति राजाची कन्या होती. राजा अश्वपती घोड्यांचे दैवत होता. कैकेयीला सात भाऊ आणि ती एकुलती एक बहीण होती. अर्थातच कैकेयी सर्वांची लाडकी होती. कैकेयी रुपवान होती. जणू सौंदर्याची खाण होती, शूर होती. दशरथ राजा हा राजा हरिश्चंद्राप्रमाणे ख्यातनाम होता. युद्ध कौशल्यात निपूण होता. जनहितरक्षक होता. अनेक देशात भ्रमण करताना त्यांचे स्वागत आदरपूर्वक केले जात असे. राजा दशरथ कैकेय राज्यात राजा अश्वपतीच्या आग्रहाखातर आला होता. त्यावेळी आदरतिथ्याची संपूर्ण जबाबदारी राजकन्या कैकेयी हिच्यावर होती. राजा दशरथ कैकेयीच्या आदरतिथ्याने आणि मोहक सौंदर्याने घायाळ झाला होता. अश्वपतीकडे कैकेयी सोबत लग्नाची मागणी घातली. वडिलांचा शब्द प्रमाण मानून कैकेयीने होकार दिला. पुढे थाटामाटात लग्न पार पडले. राजा दशरथास पहिल्या पत्नीपासून म्हणजे राणी कौसल्यापासून मुल नव्हते. तसेच कैकेयीपासुनही मुल नव्हते म्हणून मग काशी राजाची कन्या सुमित्रा हिच्यासोबत लग्न केले. त्यानंतर पुत्रप्राप्तीसाठी एक महान यज्ञ केला. मग राणी कौसल्येने रामाला जन्म दिला. मग कैकेयीलाही एकुलता एक मुलगा झाला त्याचे नाव भरत ठेवले आणि सुमित्रा राणीला दोन मुलगे झाले लक्ष्मण आणि शत्रुघ्न!! कैकेयीला सावत्र मुलगा राम खूप प्रिय होता. तिच्या मनात कुठलाही भेदभाव नव्हता. राम राज्याभिषेकाची बातमी मंथरा जेव्हा तिला सांगायला आली तेव्हा ती आनंदाने नाचू गाऊ लागली होती. पण मंथराने तिच्या कानात, मनात विष उतरवले. मंथरेच्या कानभरण्याने मग कैकेयी मतपरिवर्तन झाले. भरतास अयोध्येचे राज्य मिळावे या हेतूने तिने आपला सावत्र मुलगा राम यास वनवासास धाडण्याची गळ दशरथाला घातली. मुळात कैकेयी दुष्ट नव्हती. रामायण घडण्यासाठी तीचा स्वभाव ही देवादिकांची काळाची गरज होती.


राम वनवासात गेल्याची बातमी समजताच भरतास अतीव दुःख झाले. तेव्हा ममतामयी, दयाळू कैकेयीने भरतास रामास परत आणण्याची अनुमती दिली. सर्वांचीच इच्छा आणि जनमतही रामाच्या बाजुने होते. बहुमताने राम अयोध्येचा राजा बनूही शकला असता पण रामाने तसे करण्यास सपशेल नकार दिला कारण राम जाणत होता तसा केलेला राज्याभिषेक नीतीला धरुन नव्हता. शिवाय रावणासारख्या दुष्टाचा संहार करणे गरजेचे होते.

'कैकयी' हे पात्र रामायणाच्या कथेला विलक्षण कलाटणी घेऊन अवतरते. पुढील रामायण घडण्यासाठी ती कथानकाची गरज होती.वाल्मिकांनी रेखाटलेल्या प्रत्येक व्यक्तीरेखांना स्वतः ची नितीमत्ता होती. त्यात कैकयी हे पात्र श्रावणबाळाच्या कथेचा शाप पूर्णत्वास नेण्यासाठी महत्वपूर्ण होती. आजच्या काळातील भ्रष्ट राजकारण्यांची दलबदलू वृत्तीपेक्षा नितीमत्ता जपणारी कैकयी महानच होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. **

# गोष्ट भुताची

निलेश साठे

आमच्या गावात एक सत्तरी ओलांडलेलं म्हातारं होतं. त्याला सगळे अण्णा म्हणायचे. अण्णा एकटाच त्याला कोणीही नातेवाईक नव्हते. हा अण्णा गोष्टी सांगण्यात लय पटाइत होता. रोज रात्री आम्ही अंगणात झोपायचो. मग आम्ही सगळी लहान मुलं अण्णा गोष्ट सांगा अण्णा गोष्ट सांगा म्हणून अण्णांच्या मागे लागायचो. अण्णा रोज एक गोष्ट सांगायचा. त्याची गोष्ट ऐकूनच आम्ही झोपी जायचं असा अलिखित नियमच जणू बनलेला. एके रात्री असंच आम्ही सर्व मुले अण्णांना गोष्ट सांगा म्हणून मागे लागलो. आम्ही सात-आठ जण. सर्वांचे वय आठ ते दहा असेल त्यावेळी. आणि तो म्हातारा आण्णा. एवढा आमचा गोतावळा जमलेला. जसं आम्ही सर्व मुले म्हणालो अण्णा गोष्ट सांगा तसा अण्णा म्हणाला आज मी तुम्हाला गोष्ट नाही माझ्या आयुष्यातली खरी हकीकत सांगतो. मग अण्णांनी हकीकत सांगायला सुरुवात केली.



एक दिवस म्हणे मी काही कामानिमित्त तालुक्याच्या गावाला गेलो होतो. ते काम करता करता मला रात्र झाली. रात्रीचे आठ वाजून गेले. शेवटची रात्री आठ ची गाडी निघून गेली होती. आता झाली का पंचाईत. आता काय करायचं. दुसरा काही मार्ग मला दिसेना. आता घरी जायचं तर कसं जायचं. थंडीचे दिवस होते. गावात कोणी ओळखीचे ही नव्हतं. काय करावं काय करावं सूचेनासं झालं. स्टँडवर एक पानाची टपरी दिसली. तिथून तंबाखू आणि चुना घेतला. तंबाखू मळली तोंडात टाकली. आन चल म्हणलं गड्या बिगी बिगी. तालुक्याचे गाव म्हणजे आपल्या गावापासून चाळीस-पन्नास किलोमीटर दूर. एवढं अंतर चालायचं होतं. म्हणजे चार पाच तास तरी नक्की लागणार. झपाझप पावलं पुढे टाकीत मी चालत राहिलो. एक दोन गावं मागं टाकली. काळाकुट्ट अंधार. रस्त्यावर फक्त रात किड्यांची किरकिर. मध्येच लांब कुठेतरी कुत्रं भूकल्याचा आवाज यायचा. कधीतरी एखादं मांजर म्याऊ करायचं. रस्त्याने एखादं वाहन नाही की एखादं पाखरू नाही. काळा कुट्ट अंधार आणि मी एकटाच त्या रस्त्याने झपाझप पुढे चालत होतो. तेवढ्यात मला कसलातरी भास झाला. मी मागे वळून पाहिलं तर कुणीच नव्हतं. मी तसाच पुढे चालत राहिलो. मी जस जसा पुढे चालत होतो तसं तसं मला जाणवत होतं की माझ्यासोबत कोणीतरी चालत आहे. मी आजूबाजूला बघितलं तर कुणीच नव्हतं. मग मी चालण्याचा वेग वाढवला. थोडं धावत सुटलो. तरीपण कुणीतरी माझ्यासोबत धावतंय असं मला वाटू लागलं. मग मी आणखी जोरात धावू लागलो. पण थोड्याच वेळात माझ्या लक्षात आलं मी जे धावतोय ते फक्त एकाच जागेवर धावतोय पुढे मी जातच नाही मग मात्र मी एका जागेवर थांबलो. जसं मी थांबलो कुणीतरी माझ्या खांद्यावर हात ठेवला. भला मोठा हात. मी माझ्या दोन्ही हातानं तो हात झटकायचा प्रयत्न केला तरी तो मला हात उचलता येईना. आणि मला तो फक्त हात दिसत होता बाकी शरीर दिसतच नव्हतं. मी समजुन गेलो. मला भूतानं घेरलंय.

आम्ही मुलं ही खरंतर घाबरलो. मग अण्णा पुढे सांगू लागला. पण मी घाबरणारा नव्हतो. आपण लय डेंजर आहे. भुताला कसं पळवायचं याची आपल्याला चांगलीच आयडिया होती. मी मटकन खाली बसलो. घातला धोतरात हात. काढलं बाहेर. अन लागलो मुतायला. अन तिथंच खाली बसून गोल मुताचं रिंगण केलं. आणि त्या रिंगणातच बसलो. तसेच ते भूत थोडसं मागे सरकलं. अन थोड्या दूर अंतरावर बसलं माझ्या शेजारीच. ते एवढं मोठं होतं तर माझ्या कवेत एक मांडी बसणार नाही इतकी भली मोठी मांडी. भला मोठा उंच देह. ते खाली बसलं होतं तरी मला उंच वर मान करून त्याच्याकडे बघावं लागत होतं. भले मोठे डोळे. डोक्याला पटका गुंडाळलेला. भले मोठे दात आणि खी खी करून माझ्याकडे पाहून हसत होतं. मग मी काय केलं उजव्या हाताच्या ओंजळीत थोडासा मुत घेतला. आणि म्हणलं टाकू का टाकू का. असं म्हणत मी त्याला बाचकवलं कि ते मागे मागे सरकायचं. टाकू का म्हटलं की घाबरून मागे सरकायचं. मग मी ते मूत्र तसंच ओंजळीत ठेवून डोळे घट्ट मिटून घेतले. आणि थोड्यावेळाने जेव्हा डोळे उघडले तेव्हा मी माझ्या घरामध्ये होतो. त्या भूतानं काय केलं त्याने त्याच्या जादूने मला अलगद उचलून माझ्या घरात नेऊन ठेवलं. आपल्या मुताला भूत लय घाबरतं बरं. माझ्यासमोर कसलं भूतबीत येत नसतं. आता ही गोष्ट खरी की खोटी माहित नाही पण तेव्हा आम्हाला ती खरीच वाटली होती. कारण अण्णा कधी खोटं बोलायचा नाही अशी त्या वेळची लोक सांगायचे. कितीतरी वर्षांपूर्वी अण्णांनी सांगितलेली गोष्ट आजही लक्षात आहे. अर्थात अण्णांची गोष्ट सांगण्याची पद्धत वेगळी होती. फार रस भरून सांगायचे. जशीच्या तशी जरी नसली तरी कथेचा सार मात्र आजही लक्षात राहिला आहे ही अण्णांची किमयाच म्हणावी लागेल. **

# यशस्वी जैस्वाल शतकाच्या उंबरठ्यावर

## भारताचे कांगारूंवर वर्चस्व

**। पर्थ । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत संघातील पर्थ येथील कसोटी मालिकेतील पहिल्याच सामन्याच्या पहिल्या दिवशी तब्बल १७ बळी गेले होते. परंतु, दुसऱ्या दिवशी मात्र अवघे ३ बळी गेले. दुसऱ्या दिवस अखेर भारतीय संघाने दुसऱ्या डावात ५७ षटकांत बिनबाद १७२ धावा केल्या. त्यामुळे भारतीय संघ दिवस अखेर २१८ धावांनी आघाडीवर आहे.

भारताकडून पहिल्या डावात शुन्यावर परतलेल्या यशस्वी जैस्वालने दुसऱ्या डावात केएल राहुलसोबत दमदार फलंदाजी केली. या दोघांनी दुसऱ्या दिवसाचे दोन सत्र खेळून काढताना जवळपास पावणेदोनशे धावांची भागीदारी केली. दिवस संपला तेव्हा यशस्वी जैस्वाल १९३ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ९० धावांवर नाबाद होता. तसेच, केएल राहुल १५३ चेंडूत ६२ धावांवर नाबाद राहिला होता.



दरम्यान, या सामन्यात दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने २८ षटकांपासून ७ बाद ६७ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली होती. परंतु, दिवसाच्या दुसऱ्याच षटकात म्हणजे २९ व्या षटकात ॲलेक्स कॅरे याला जसप्रीत बुमराहने बाद करत त्याचे ५ बळी पूर्ण केले. त्यानंतर हर्षित राणाने नॅथन लायनला ५ धावांवर बाद केले.परंतु, शेवटच्या बळीसाठी जोश हेजलवूड आणि मिचेल स्टार्क यांनी भारतीय गोलंदाजांना झुंजावले. त्यांनी ११० चेंडू खेळून काढताना २५ धावांची भागीदारी केली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने १०० धावांचा टप्पा पार केला.

स्टार्कने ऑस्ट्रेलियाकडून पहिल्या डावात सर्वाधिक २६ धावांची खेळी केली. शेवटी स्टार्कला हर्षित राणाने बाद करत ऑस्ट्रेलियाचा डाव १०४ धावांवर संपवला. त्यामुळे ऑस्ट्रेलिया ४६ धावांनी पिछाडीवर पडले. या डावात भारताकडून सर्वाधिक बळी जसप्रीत बुमराहने घेतल्या, तसेच पदार्पणवीर हर्षित राणाने ३ बळी आणि मोहम्मद सिराजने २ बळी घेतले. तत्पुर्वी भारताचा पहिला डाव १५० धावांवर संपला होता. भारताकडून नितीश रेड्डीने ४१ धावा आणि ऋषभ पंतने ३७ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून जोश हेजलवूडने ४ बळी घेतले होते.

# सेहवागच्या लेकाचा भीम पराक्रम

## मेघालयाविरूद्ध द्विशतकी खेळी

**। शिलाँग । वृत्तसंस्था ।**

माजी भारतीय धडाकेबाज सलामी फलंदाज विरेंद्र सेहवागच्या लेकाने कूच बेहार ट्रॉफी स्पर्धेमध्ये द्विशतक ठोकले आहे. शिलाँगमधील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या मेघालाविरूद्धच्या सामन्यात दिल्लीकडून खेळताना आर्यवीर सेहवागने २०० धावांची नाबाद खेळी केली आहे. आर्यवीरच्या द्विशतकी खेळीच्या जोडीने दिल्लीने सामन्यात दुसऱ्या दिवसाअंती २०८ धावांची आघाडी घेतली आहे.

दरम्यान, मेघालयाचे ५ आगामी फलंदाज अवघ्या ७५ धावांवर बाद झाले. पण, चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या गौरव नार्लेंगने सावध खेळी केली. त्याने ७ क्रमांकाचा फलंदाज क्षितीजला साथीला घेत ६१ धावांची भागिदारी केली. ६० व्या षटकात नार्लेंग १९ चौकारांच्या मदतीने ९५ धावांची खेळी करून बाद झाला. त्यानंतर क्षितीजने अंगकीतसोबत पुन्हा ६५ धावांची भागीदारी उभारली. पण २१८ चेंडूत ६२ धावांवर क्षितीज बाद झाला आणि मेघालयाचा पहिला डाव २६० धावांवर संपुष्टात आला. प्रत्युत्तरात दिल्लीच्या सलामीवीरांनी मोठी खेळी केली. अर्नव बग्गा व आर्यवीर सेहवागच्या जोडीने पहिल्या विकेटसाठी १८० धावांची मोठी भागीदारी केली. यानंतर दिल्लीने आपला पहिला गडी गमावला. अर्नव बग्गा १०८ चेंडूत १९ चौकार व ३ षटकारांसह ११४ धावांची शतकी खेळी करून बाद झाला. त्यानंतर ३ क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या वंश जेटलीने ४३ धावांची खेळी केली. आर्यवीर व वंशने १०० धावांची भागीदारी केली. त्यानंतर चौथ्या क्रमांकाचा फलंदाज धन्य नाक्राने आक्रमक खेळी करत दिवअंती पर्यंत ९१ चेंडूत ९८ धावांची खेळी केली. तर, आर्यवीर सेहवागने द्विशतकी खेळी केली, ज्यामध्ये त्याने ३४ चौकार व २ षटकार ठोकले. त्याच्या देशांतर्गत क्रिकेटच्या कारकिर्दितील हे पहिलंच द्विशतक आहे.



# फिल सॉल्टची स्फोटक खेळी

**। अबुधाबी । वृत्तसंस्था ।**

कोलकाता नाईट रायडर्स संघाने आयपीएल २०२५ साठी संघातून रिलीज केलेल्या इंग्लंडच्या फिल सॉल्टने अबुधाबी टी-१० लीगमध्ये स्पोटक खेळी केली आहे. अबुधाबी संघाकडून खेळताना अजमान बोल्ट्स संघाविरूद्ध सॉल्टने अवघ्या १८ चेंडूत ५२ धावांची खेळी करत जलद अर्धशतक पुर्ण केले. ज्यामुळे त्याने एका षटकात ३४ धावा करत धुव्वाधार कामगिरी केली आहे. अजमान बोल्ट्स संघाच्या ७९ धावांच्या प्रत्युत्तरात अबुधाबी संघाने ८१ धावा केल्या आणि ९ गडी राखून सामन्यात बाजी मारली आहे.

दरम्यान, अजमान बोल्ट्स संघाने प्रथम फलंदाजी करत १० षटाकांमध्ये ८ गडी गमावत ७८ धावांची खेळी केली. ज्यामध्ये अजमान बोल्ट संघाचा सलामी फलंदाज शेवॉन डॅनियल याने चांगली फलंदाजी करत होता. पण, दुसऱ्या बाजूने बोल्ट्स संघाचे आगामी फलंदाज स्वस्तात परतत होते. आगामीचे ४ फलंदाज एक अंकी धावा करून तंबूत परतले. तर, सलामीवीर शेवॉन डॅनियलने ३ चौकार व एका षटकाराच्या सहाय्याने १० चेंडूत २२ धावांची खेळी केली. सहाव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या रवी बोपारानेही ३ चौकार व एका षटकाराच्या मदतीने २३ धावा उभारल्या. साथीदार स्नेहान जयसुर्याने ८ चेंडूत १० धावांची नाबाद खेळी केली. तर, पुढील तिन्ही खेळाडू अशा अवघ्या ८ धावा करू शकले. अबुधाबी संघाच्या गोलंदाजांनी बोल्ट्स संघाचा डाव ७९ धावांवर गुंडाळला आणि जिंकण्यासाठी ८० धावांचे आवाहन स्वीकारले.



# राजस्थान रॉयल्स अंतिम विजेता

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राजस्थान रॉयल्स संघाने अष्टपैलू स्पोर्ट्स संघाला १ गडी राखून पराभूत करतना इकोल स्पोर्ट्स फाउंडेशनच्यावतीने घेण्यात येणाऱ्या इकोल टी-२० करंडक स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे.



शिंदे हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या अंतिम लढतीत, अष्टपैलू संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ७ बाद १६४ धावांपर्यंत मजल मारली. यावेळी मित राठोडने फटकेबाजी करताना ३६ चेंडूत ३ चौकार व ६ षटकारांच्या सहायाने ६१ धावांची खेळी केली. त्याला अश्कन काझीने ३०, हर्ष संघवीने २२ धावा करताना सुरेख साथ दिली. ओंकार राजपूतने ३ तर केदार बजाज, निमिर जोशी, साव्या गजराज, निलय नेवासकर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

केदार बजाजने केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्स अकादमी संघाने २० षटकांत ९ बाद १६५ धावा करताना विजय साकारला. केदार बजाजने १० चेंडूत नाबाद ३३ धावा करताना ४ षटकार मारताना संघाला शेवटच्या चेंडूवर विजय मिळवून दिला. स्नेहल खामणकरने सर्वाधिक ४०,

### ■ अष्टपैलू स्पोर्ट्स संघावर केली मात

ओंकार राजपूतने २२, मेहुल पटेल २१, निलय नेवासकर १८ धावांचे योगदान दिले. अमित राठोडने ४, दीपक डांगी व अश्कान काझी यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. सामनावीर पुरस्काराने केदार बजाजला सन्मानित करण्यात आले. सर्वोत्तम फलंदाज अष्टपैलू स्पोर्ट्सच्या सागर पवारला, सर्वोत्तम गोलंदाज म्हणून अष्टपैलू स्पोर्ट्सच्या दीपक डांगीला तर मालिकावीर म्हणून राजस्थान रॉयल्स अकादमीच्या साव्या गजराजला सन्मानित करण्यात आले.

# हार्दिक पहिल्या सामन्याला मुकणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीग २०२५ साठी २४ व २५ नोव्हेंबरला सौदी अरेबियाच्या जेद्दाह येथे मेगा लिलाव पार पडणार आहे. पाचवेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सने आयपीएलच्या लिलावापूर्वी रोहित शर्मा, हार्दिक पांड्या, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह व तिलक वर्मा यांना आपल्या संघात कायम राखले आहे. पण, हार्दिक पांड्यावर आयपीएलच्या पुढील पर्वातील पहिल्या सामन्यात खेळण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. मुंबईला तगडा संघ तयार करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. पण, त्यांना आयपीएल २०२५ च्या पहिल्या सामन्यात कर्णधार हार्दिक पांड्याशिवाय खेळावे लागणार आहे. कर्णधार हार्दिकला आयपीएल २०२४च्या शेवटच्या साखळी सामन्यात निर्धारीत वेळेत षटकं पूर्ण न केल्याने ३० लाखांचा दंड भरावा लागला होता. आयपीएलच्या मागील पर्वातील हार्दिककडून तिसऱ्यांदा ही चूक झाल्याने त्याच्यावर एका सामन्याच्या बंदीची कारवाई केली गेली आहे. या सामन्यानंतर मुंबईचे स्पर्धेतील आव्हानही संपले होते, त्यामुळे हार्दिकवर लागलेली बंदी ही आयपीएल २०२५च्या पहिल्या सामन्यापर्यंत कायम राहणार आहे. त्यामुळेच त्याला आयपीएलचा पहिला सामना खेळता येणार नाही.



## श्रेयसची तुफानी खेळी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेमध्ये मुंबईने गोवा संघाविरूद्ध प्रथम फलंदाजी करत तब्बल २५० धावा केल्या आहेत. ज्यामध्ये श्रेयस अय्यरने ५७ चेंडूत १३० धावा करत दणदणीत शतक ठोकले आहे. श्रेयस या स्पर्धेमध्ये मुंबई संघाचे नेतृत्व करत असून त्याने मुंबईला एकतर्फी धावा उभारून दिल्या आहेत. श्रेयसने या खेळीमधून उद्यापासून सुरू होणाऱ्या आयपीएल ऑक्शनमधील फ्रँचायझींनाही महत्वपुर्ण संदेश दिला आहे. श्रेयसच्या या खेळीचा आयपीएल ऑक्शनवर प्रभाव पडण्याची शक्यता आहे. आयपीएल ऑक्शन कर्णधार श्रेयस अय्यरला कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएल २०२५ हंगामासाठी रिलीज केले. श्रेयस अय्यरला आयपीएल २०२४ नंतर भारतीय संघात देखील संधी मिळाली नाही. पण या हंगामामध्ये श्रेयस देशांतर्गत क्रिकेट खेळला.

# भारताची उपांत्यफेरीत धडक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताची पुरुष दुहेरीतील अनुभवी जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी यांनी पुनरागमनाच्या स्पर्धेत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. सात्विक-चिराग जोडीने दुसरी मानांकित जोडी किम ॲस्टरुप-ॲंडर्स रासमुसेन या डेन्मार्कच्या जोडीवर २१-१६, २१-१९ असा सरळ दोन डावांत विजय मिळवला आणि अंतिम चार फेरीमध्ये प्रवेश केला.

सात्विक-चिराग या जोडीने पॅरिस ऑलिंपिकनंतर एकाही स्पर्धेत सहभाग घेतला नव्हता. भारतीय जोडी थेट चायना मास्टर्स स्पर्धेत सहभागी झाली. किम ॲस्टरुप-ॲंडर्स रासमुसेन या जोडीविरुद्ध सात्विक-चिराग जोडीने आश्वासक सुरुवात केली. पहिल्या डावातील ब्रेकपर्यंत भारतीय जोडीकडे ११-८ अशी आघाडी होती. त्यानंतर ही आघाडी १६-१० अशी वाढवण्यात त्यांना यश मिळाले. भारतीय खेळाडूंनी रॅलीच्या खेळात उल्लेखनीय कामगिरी बजावताना पहिला डाव २१-१६ असा आपल्या नावावर केला.

सात्विक-चिराग या जोडीसमोर दुसऱ्या डावात कडवे आव्हान उभे ठाकले. डेन्मार्कच्या जोडीने ७-५ अशी आघाडीही मिळवली. त्यानंतर भारतीय जोडीने ८-८ अशी बरोबरी केली, तसेच ब्रेकमध्ये ११-१० अशी छोटी आघाडीही भारतीय जोडीला घेता आली. डेन्मार्कच्या जोडीने आपला खेळ उंचावला आणि बरोबरी करण्याचा प्रयत्न केला. किम ॲस्टरुपच्या चुकीमुळे भारतीय जोडीला १९-१८ असे पुढे होता आले. अखेर सात्विक-चिराग जोडीने २१-१९ असा हा गेम जिंकत सामन्यातही यश मिळवले.




# मोहम्मद नजीर यांचे निधन

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचे महान क्रिकेटपटू आणि पंच मोहम्मद नजीर यांचे वयाच्या ७८व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांची प्रकृती बऱ्याच दिवसांपासून खराब होती. मोहम्मद नजीर यांचा मुलगा नौमन नजीर याने वडिलांच्या निधनाची बातमी दिली आहे. नजीर यांनी पाकिस्तानसाठी १४ कसोटी आणि ४ एकदिवसीय सामने खेळले आहेत. मात्र, ते त्यांच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीसाठी सर्वाधिक ओळखले जात होते.

काही दिवसांपूर्वी नजीर खूप आजारी पडले होते. त्यांना छातीत जंतुसंसर्ग झाला होता आणि ते जलोदर नावाच्या आजारानंही ग्रस्त होते. त्यांच्यावर लाहोरमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. या दिग्गज पाकिस्तानी क्रिकेटरची तब्येत ढासळण्याचे एक कारण म्हणजे ते ५ वर्षांपूर्वी एका अपघाताचे बळी ठरले होते. त्यानंतर त्यांना सतत आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते.



मोहम्मद नजीर उजव्या हाताने ऑफ-स्पिन गोलंदाजी करायचे. त्यांनी पाकिस्तानसाठी १४ कसोटी सामन्यात ३४ बळी घेतले आहेत. याशिवाय ४ एकदिवसीय सामन्यात त्यांच्या नावावर ३ बळी आहेत. त्यांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीपेक्षा प्रथम श्रेणी कारकिर्दीच्या आकडेवारीसाठी अधिक ओळखले जायचे. नजीर यांनी आपल्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत १८० सामने खेळले, ज्यात त्यांनी तब्बल ८२९ बळी घेतले आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्यांनी दोन शतकी खेळीसह ४ हजार २४२ धावाही केल्या आहेत. नजीर यांनी क्रिकेट कारकीर्द संपल्यानंतर अंपायरिंगही केले आहे.

## मार्च ते मे दरम्यान खेळवणार सामने

# आयपीएल हंगामाच्या तारखा जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

एकिकडे बॉर्डर-गावसकर चषक सुरू असतानाच इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पुढील तीन हंगामांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. आयपीएल २०२५ हंगामाचा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. अशात या लिलावाच्या दोन दिवसआधीच पुढील तीन हंगामाच्या तारखा समोर आल्या आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, बीसीसीआयने शुक्रवारी (दि.२२) सकाळी फ्रँचायझींशी संपर्क साधला आहे. बीसीसीआयने कळवलेल्या तारखांनुसार आयपीएल २०२५ स्पर्धा १४ मार्च ते २५ मे दरम्यान खेळवली जाणार आहे. तसेच, आयपीएल २०२६ स्पर्धा १५ मार्च ते ३१ मे दरम्यान खेळवली जाणार आहे. त्याचबरोबर आयपीएल २०२७ स्पर्धा १४ मार्च ते ३० मे दरम्यान खेळवली जाणार आहे.

आयपीएलच्या तारखा आधीच घोषित केल्या असल्याने बीसीसीआय आणि आयपीएल अधिकाऱ्यांसह इतर क्रिकेट बोर्डांसाठीही सोयीस्कर ठरणार आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि आयपीएल यांच्यात समन्वय राखण्यास मदत होईल. आयपीएल २०२५ मध्ये ७४ सामने आणि २०२६ व २०२७ मध्ये ८४ सामने खेळवण्यात येण्याची शक्यता आहे. दरम्यान, असेही समजत आहे की बहुतेक सर्व क्रिकेट बोर्डांनी आयपीएलच्या पुढील तीन हंगामांसाठी खेळणारे खेळाडू संपूर्ण स्पर्धेसाठी उपलब्ध असतील असे स्पष्ट केले आहे.

### २०४ खेळाडूंवर बोली

**आयपीएल २०२५ लिलावाआधी १० संघांनी मिळून ४६ खेळाडूंना रिटेन केल्याने आता लिलावात जास्तीत जास्त २०४ खेळाडूंवर बोली लागू शकते. बीसीसीआयने लिलावासीठी ५७४ खेळाडूंची अंतिम निवड केली होती. यात सौरभ नेत्रावळकर आणि हार्दिक तामोरे यांचाही आता समावेश करण्यात आला आहे. आता एकूण ५७७ खेळाडू लिलावात असतील, ज्यातील २०४ खेळाडूंवर बोली लागू शकते.**

## तिलक वर्माचा झंझावात

**नवी दिल्ली :** सय्यद मुश्ताक अली टी-२० ट्रॉफीला शनिवारी (दि.२३) सुरुवात झाली आहे. या स्पर्धेच्या सुरुवातीलाचा भारताचा फलंदाज तिलक वर्माने हैदराबादकडून खेळताना मोठा धमाका केला आहे. शनिवारी हैदराबादचा सामना मेघालयाविरुद्ध झाला. या सामन्यात तिलकने शतकी धमाका करताना इतिहास घडवला आहे. तिलकने सूर्यासह ६८ फलंदाजांना एका झटक्यात मागे टाकले. तिलकने त्याच्या टी-२० कारकिर्दीत सलग तिसरे शतक ठोकले आहे. त्याने याआधी काही दिवसांपूर्वीच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेतील सामन्यांमध्ये सलग शतके ठोकली होती.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)